• पंढरपूर • शुक्रवार, ६ डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - १९६


## 'समंदर' लौट के आया 'सागर'से!

### 'देवेंद्रयुगा'स प्रारंभ; फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री





# शपथ विकसित महाराष्ट्राची

## महायुतीचा महाशपथविधी

**महाराष्ट्राचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज शपथ घेतली. मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस... असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी पद व गोपनियतेची शपथ घेत स्वत:च्या नावावर वेगळा विक्रम रचला. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे ते महाराष्ट्रातील एकमेव नेते आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री, दिग्गज भाजपा नेते, बॉलिवूड सेलिब्रिटी, क्रिकेटर्स, उद्योगपती, आमदार, खासदार आणि हजारो कार्यकर्त्यांच्या साक्षीने महाराष्ट्राचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी देवेंद्र फडणवीस यांना शपथ दिली.**



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

### "मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस...."



एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

### अखेर एकनाथ शिंदे बनले उपमुख्यमंत्री..!



अजित पवार
उपमुख्यमंत्री

### अजित पवारांनी घेतली सहाव्यांदा शपथ!

## चार मुख्यमंत्री अन् एक उपमुख्यमंत्री



- अजित पवारांनी १० नोव्हेंबर २०१० मध्ये पहिल्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पृथ्वीराज चव्हाण हे तेव्हा मुख्यमंत्री होते. त्यानंतर, २५ ऑक्टोबर २०१२ ते २६ सप्टेंबर २०१४ तेव्हाही पृथ्वीराज चव्हाण यांच्या पदाखाली त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.
- २३ नोव्हेंबर २०१९ ते २६ नोव्हेंबर २०१९ या काळात ते औटघटेकेचे उपमुख्यमंत्री बनले हते. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांनी या पदाची शपथ घेतली. परंतु, हे सरकार अवघ्या ८० तासांत कोसळलं.
- हे सरकार कोसळल्यानंतर लागलीच ३० नोव्हेंबर २०१९ ते २९ जून २०२३ पर्यंत ते उद्धव ठाकरेंच्या नेतृत्त्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होते.
- जून २०२३ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीत बंडखोरी करून महाविकास आघाडीतून काढता पाय घेतला. त्यानंतर २ जुलै २०२३ ते २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पद स्वीकारले.
- ५ डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** महाराष्ट्राचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज शपथ घेतली. मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस... असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी पद व गोपनियतेची शपथ घेत स्वत:च्या नावावर वेगळा विक्रम रचला. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे ते महाराष्ट्रातील एकमेव नेते आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री, दिग्गज भाजपा नेते, बॉलिवूड सेलिब्रिटी, क्रिकेटर्स, उद्योगपती, आमदार, खासदार आणि हजारो कार्यकर्त्यांच्या साक्षीने महाराष्ट्राचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी देवेंद्र फडणवीस यांना शपथ दिली. फडणवीस यांच्यासह शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनीही उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मुंबईतील आझाद मैदानावर महायुती सरकारच्या शपथविधीचा हा महासोहळा संपन्न झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आगमनानंतर राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गाऊन शपथविधी सोहळ्याला सुरुवात झाली.

**शपथविधी सोहळ्यासाठी दिग्गजांची उपस्थिती...**

• शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी, शिवराज सिंह चौहान, योगी आदित्यनाथ, भजन लाल, चंद्राबाबू नायडू आणि इतर राजकीय व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. याशिवाय उद्योगपती मुकेश अंबानी, अनंत अंबानी, राधिका अंबानी हे देखील या सोहळ्यात उपस्थित होते. शाहरुख खान, सलमान खान, संजय दत्त, माधुरी दीक्षित, रणबीर कपूर, रणबीर सिंग आणि बॉलिवूडमधील इतर सेलिब्रिटी उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीत भाजपने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मोठा विजय मिळवला, महायुतीला राज्यात २३७ जागांवर यश मिळत न भूतो न भविष्यती असे निर्विवाद बहुमत मिळाले. त्यामध्ये, १३२ जागांसह भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला. त्यामुळे, भाजप नेताच मुख्यमंत्रीपदी शपथ घेणार हे जवळपास निश्चित होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शिवसेना नेते एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे ते उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही याबाबतच्या चर्चा माध्यमात होत्या. एकनाथ शिंदे यांचीही नाराजी दूर झाली आणि त्यांनीही उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे, राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन झाले.

या भव्य शपथविधी सोहळ्यासाठी अनेक दिग्गज राजकीय नेत्यांसह चित्रपटसृष्टीतील विवध कलाकारदेखील उपस्थित होते. शपथविधीपूर्वी सुप्रसिद्ध गायक अजय-अतुल यांचा संगीत सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, परराष्ट्र मंत्री डॉ. सुब्रमण्यम जयशंकर, पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. तसेच आंध्र प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात, आसाम, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, हरियाणा, ओडीसा, गोवा, उत्तराखंड, पुडुचेरी, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, या राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्यपालदेखील उपस्थित होते.

## शासनाने केली जमीन मोजणी शुल्कामध्ये वाढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** ग्रामीण भागात शेतीच्या कारणावरून नेहमी भांडणे होतात. यासाठी जमीन मोजण्यासाठी शासनाने भूसंपादन कार्यालयाची स्थापना केली आहे. या कार्यालयाकडून शेतकऱ्यांना जमीन मोजून देण्यात येते. यासाठी 2 हेक्टरपर्यंत एक हजार रुपये फी घेतली जात होती. आता यामध्ये दुप्पट वाढ करण्यात आली आहे. जमीन मोजणीसाठी आता दोन हजार रुपये भरावे लागणार आहेत. काही दिवसापूर्वी शासनाने 100 रुपयांचे मुद्रांक बंद करून आता 500 रुपयाचे मुद्रांक सुरू केले आहे. कोणत्याही शासकीय कार्यालयात प्रतिज्ञापत्र अथवा दाखले घ्यावयाचे असल्यास 100 ऐवजी 500 रुपयाचे मुद्रांक द्यावे लागणार आहे. मुद्रांकाच्या दरामध्ये शासनाने वाढ केली असल्यामुळे नागरिकांना आर्थिक फटका बसला आहे. हा फटका सहन होतो न होतो तोच पुन्हा शासनाने जमीन मोजणीच्या दरात वाढ केली आहे. या अगोदर शेतकऱ्यांना शेतजमीन मोजणी करण्यासाठी दोन हेक्टर पर्यंत 1000 रुपये फी भरावी लागत होती.



आता यामध्ये शासनाने दुप्पट वाढ केली असून आता दोन हजार रुपये फी भरावी लागणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे. पीक लागवडीसाठी येणाऱ्या खर्चात वाढ झाली असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. यानंतर शासनाने मुद्रांक व भूसंपादन कार्यालयातील कामकाजाच्या किंमती वाढविल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार आहे.

## पिराची कुरोली, तारापूर ग्रामपंचायतीस इमारत बांधण्यासाठी निधी मिळणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतीच्या इमारती नादुरुस्त व धोकादायक झाल्या आहेत. यामुळे 25 ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी देण्यात येणार आहे. यात पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली व तारापूर या दोन ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

ग्रामीण भागात नागरिकांना सोयी सुविधा देण्यासाठी ग्रामपंचायत काम करते. तसेच विविध प्रकारचे दाखले व कर वसुलीचे काम ग्रामपंचायत इकडून केले जाते. यासाठी ग्रामपंचायतीची सुसज्य इमारत असणे गरजेचे आहे. सोलापूर जिल्ह्यात अनेक ग्रामपंचायतीच्या इमारती आहेत. मात्र काही ग्रामपंचायतीच्या इमारती जुन्या झाल्या असून तर काही धोकादायक झाल्या आहेत. यामुळे नवीन ग्रामपंचायतच्या इमारती बांधणे गरजेचे झाले आहे. यासाठी सर्वे करण्यात आला असून जिल्ह्यातील 25 ग्रामपंचायती धोकादायक झाल्या असल्याचे दिसून आले आहे. यामुळे या ग्रामपंचायती बांधण्यासाठी केंद्राच्या राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत निधी देण्यात येणार आहे. यात पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली व तारापूर या दोन ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी देण्यात येणार आहे. यामुळे ग्रामपंचायतीचे कामकाज चांगल्या प्रकारे होण्यास मदत होणार आहे.





## पीक कर्ज वाटपात

## बँकांचा हात आखडता; शेतकऱ्यांची गैरसोय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** खरीप हंगामात सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना 2 हजार 72 कोटी रुपयाचे पीक कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट शासनाने बँकांना दिले होते. मात्र बँकांनी पीक कर्ज वाटपात हात आखडता घेतला असून 194 कोटी 71 लाख रुपयाचे कर्ज वाटप केले आहे. पीक कर्ज मिळत नसल्याने शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त होत आहे . खरीप व रब्बी हंगामात पिकांची पेरणी करण्यासाठी शेतकरी बँका, खाजगी सावकार, पतसंस्था यांच्याकडून कर्ज घेतो. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास कर्ज फेडता येत नाही. मात्र कर्जाची वसुली केली जाते. यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे शासनाने शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांना शेतकऱ्यांना बिनव्याजी पीक कर्ज वाटप करावे असे आदेश दिले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकांनी 2072 कोटी रुपयाचे वाटप करावे असे आदेश शासनाने दिले आहेत. मात्र विधानसभा निवडणुकीत महायुती शासनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. यामुळे शेतकरी बँकांची कर्जे फेडत नसल्याने बँकांचे शेतकऱ्यांकडे कोट्यावधी रुपये अडकले आहेत. याचा परिणाम रब्बी हंगामातील पीक कर्ज वाटपावर झाला आहे. जिल्ह्यातील बँकांनी रब्बी हंगामात 194 कोटी 71 लाख रुपयाचे वाटप केले आहे. हे प्रमाण शासनाने दिलेल्या उद्दिष्टापैकी दहा टक्के उद्दिष्ट पूर्ण केले असल्याचे दिसून येत आहे. बँकांकडून पीक कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. यंदा जून महिन्यापासून चांगला पाऊस पडला आहे. यामुळे शेतात चांगले पीक येणार असल्याने शेतकरी खुशीत आहेत. मात्र पिकांची लागवड करण्यासाठी बँकांकडून कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे.



**सोलापूर** : पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यामार्फत सन 2024-2025 या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात यासाठी पात्र लाभार्थींना 20 डिसेंबर 2024 पर्यंत अर्ज सादर करावेत असे, आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल. नरळे यांनी केले आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम, वैरण व पशुखाद्य कार्यक्रम अंतर्गत 50 टक्के अनुदानावर मुरघास निर्मितीस प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

## रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित

# शिवाजी पॉलिटेकनिक कॉलेजमधे पालक मेळावा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला** : सांगोला येथील रामकृष्ण टेक्निकल एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा दिनांक 30/11/2024 रोजी संपन्न झाला. पालक मेळाव्याची सुरुवात पालक प्रतिनिधी श्री. तानाजीकाका पाटील, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाबुराव गायकवाड, सचिव, श्री. अंकुशराव गायकवाड, महिला पालक प्रतिनिधी सुरेखा बाबर व कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. यावेळी श्री. बाबुराव गायकवाड यांच्या हस्ते पालक प्रतिनिधी श्री. तानाजीकाका पाटील व सुरेखा बाबर यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. आर.ए.देशमुख यांनी संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबुराव गायकवाड व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजच्या प्रगतीचा आढावा सादर करून उन्हाळी परीक्षा 2024 च्या निकालचे वाचन केले. यावेळी अनेक पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी सुरेखा बाबर व तानाजीकाका पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कॉलेजमधे राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक करून शिक्षक व कॉलेजचे व्यवस्थापन यांचे अभिनंदन केले. यावेळी कॉलेजच्यावतीने विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या 'दत्तक पालक योजना' व ' रात्र अभ्यासिका' या उपक्रमांचे पालकांनी विशेष कौतुक केले. पालकांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबुराव गायकवाड यांनी पालक मेळाव्याच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची ग्वाही दिली.या वेळी त्यांनी उपस्थित पालकांना आपल्या पाल्यांना मोबाईलच्या अतिवापरापासून दूर ठेवण्याचे आवाहन केले. पुढे बोलताना ते म्हणाले की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालक व कॉलेजचे व्यवस्थापन यांच्यामध्ये कायम संपर्क व संवाद असणे गरजेचे आहे. पालकांनी केवळ पालक मेळाव्यापुरतेच उपस्थित न राहता वेळ मिळेल तेव्हा कॉलेजला भेट देऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. कार्यक्रमासाठी बहुसंख्य पालक उपस्थित होते. सदर पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य, विभाग प्रमुख,

## एसटी कर्मचाऱ्यांना मिळाला सहा हजार बोनस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे कर्मचारी दिवाळी भेटीची वाट पाहत होते. कर्मचाऱ्यांना बोनस देण्याची मागणी दिवाळीपूर्वीच करण्यात येत होती. दिवाळी संपून जवळपास वीस पंचवीस दिवसांनी प्रशासनाने दिवाळी बोनस एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याने त्यांना दिलासा मिळाल्याचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी सांगितले. राज्य मार्ग परिवहन महामंडळ सोलापूर विभागात 6000 कर्मचारी असून या कर्मचाऱ्यांना याचा लाभ झाला आहे. त्यामुळे उशिरा का होईना सहा हजार रुपये बोनस मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये उत्साह दिसून येत आहे.

## Selected

### विनापरवाना फलक लावल्याप्रकरणी पाच गुन्हे दाखल

**सोलापूर :** सोलापूर शहरातील रस्ता दुभाजकात असलेल्या विजेच्या खांबावर तसेच सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना डिजिटल होर्डिंग लावल्याप्रकरणी महापालिकेच्या वतीने विविध पोलीस ठाण्यात पाच गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विजापूर नाका पोलीस ठाण्यात तीन तर फौजदार चावडी आणि सदर बाजार पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेचे संबंधित कनिष्ठ अभियंता, भूमापक यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार संबंधित पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### भाजप कार्यकर्त्यांनी केला आनंदोत्सव साजरा



**सोलापूर :** विधिमंडळ गटनेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड होताच सोलापुरात भाजपच्या वतीने जल्लोष करण्यात आलाय. विधिमंडळ गटनेते म्हणून निवड झालेले देवेंद्र फडणवीस हे उद्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. सोलापुरातील भाजपा कार्यालयाजवळ जमून भाजप कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत, एकमेकांना मिठाई भरवून ढोल तश्याच्या गजरात ठेका धरत जल्लोष केलाय. उद्या देवेंद्र फडणवीस हे शपथ घेतील आणि राज्यात राहिलेली विकास कामे मार्गी लावतील असा विश्वास या निमित्ताने भाजप पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलाय.

### जिल्हा परिषद शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक भरती



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात 10 पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये डीएड आणि बीएड केलेल्या तरुण-तरुणींना कंत्राटी शिक्षक म्हणून नेमले जाणार आहे. यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागणार आहे. कंत्राटी शिक्षकांना दरमहा 15 हजार रुपये मानधन मिळेल. नियुक्ती एक वर्षासाठी असेल, पण काम समाधानकारक ठरल्यास मुदतवाढ मिळू शकते. शाळांच्या नियुक्ती प्रक्रियेची संमती सामान्य प्रशासन विभागाकडून मिळाल्यानंतर डिसेंबरअखेर पूर्ण होईल.

### ट्रॅक्टर विहिरीत कोसळून तीन बालकांचा बुडून मृत्यू



**माढा :** ऊसतोड मजुरांची ट्रॅक्टर ट्रॉली शेतातील विहिरीत कोसळून ऊसतोड मजुरांची तीन बालके मृत्युमुखी पडली. माढा तालुक्यातील शिंगेवाडी शिवारात सकाळी ही दुर्घटना घडली. अपघातग्रस्त ट्रॅक्टर नेहमीच्या चालकाऐवजी ऊसतोड मजूर टोळीचा मुकादम चालवत होता. त्याच्यावर कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अपघातातील तिन्ही मुलांचे पालक नंदूरबार जिल्ह्यातील आहेत. रिंकू सुकलाल वसावी (वय ३), नीतेश शिवा वसावी (वय ३) आणि आरव पाडवी (वय ४) अशी मृत बालकांची नावे आहेत.

## निवेदन....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अकलूज :** आज नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरीसाहेब यांची यांची खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भेट घेऊन माढा लोकसभा मतदारसंघातील रस्ते विकास व दळणवळणाच्या विविध प्रश्नांबाबत भेट घेतली व निवेदन दिले. विविध मागण्यांचे निवेदन स्वीकारताना मा. नितीन गडकरी.

## हत्तूरजवळ मुग्धबलाक करकोच्या पक्षांची गर्दी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर गावच्या शिवारात विजयपूर पुणे महामार्गावरील बाह्यवळण रस्त्यालगत साचलेल्या पाण्यात स्थानिक स्थलांतर करणाऱ्या मुग्धबलाक करकोच्या पक्षांनी गर्दी केली आहे. हे करकोचे सकाळी व संध्याकाळच्या वेळी पाणी व दलदल असलेल्या ठिकाणी दिसून येत आहेत. दलदलातील अन्नाचे शोध घेत हे करकोचे सध्या शेत शिवारातील ताली व पाण्याच्या डबक्यात आपल्या उदरनिर्वाहासाठी गर्दी करत आहेत. पुढील काही दिवसात येथील पाणी आटल्यावर हे करकोचे हिप्परगा तलाव, उजनी जलाशय यासारख्या मोठ्या जलस्थानाकडे निघून जाऊ शकतात.






## "कर्मयोगी आबासाहेब" 28 कोटी 41 लाखाचा गल्ला करत पाचव्या आठवड्यात ही बॉक्स ऑफिसवर हिट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस** : जागतिक विक्रमी चित्रपट निर्माते अल्ताफ दादासाहेब शेख दिग्दर्शित "कर्मयोगी आबासाहेब" हा चित्रपट पाचव्या आठवड्यात ही बॉक्स ऑफिसवर धूम करत आहे. सिंघम अगेन, भुलभुलैया 3 यासारख्या चित्रपटांना टक्कर देत संपूर्ण भारतभरात 29 दिवसात ₹. 28.41 कोटींचा व्यवसाय केला.

स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांचे नातू बाबासाहेब देशमुख यांनाही आमदारकी विजय मिळवण्यासाठी या चित्रपटाचा 100% फायदा झाला आहे

अल्ताफ दादासाहेब शेख दिग्दर्शित आणि लिखित "कर्मयोगी आबासाहेब" या मराठी चित्रपटात आबासाहेबांच्या वारशाचा सन्मान, सशक्त संवाद आणि हृदयस्पर्शी कथन यांचा मिलाफ आहे. हा चित्रपट प्रदर्शनापूर्वीच ॲम्स्टरडॅम लिफ्ट-ऑफ आणि क्राऊनवूड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटाने "गिनीज बुक आणि हाई रेंज ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड" हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार ही प्राप्त केला आहे. या चित्रपटाची निर्मिती मायाक्का माऊली फिल्म प्रोडक्शन अँड मुंबई क्रिएशन एन्टरटेन्मेंट, निर्माता बाळासाहेब महादेव एरंडे आणि मारुती तुळशीराम बनकर यांचे आहे. स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांच्या भूमिकेत अनिकेत विश्वासराव आणि हिंदी आणि मराठीतले तब्बल 28 कलाकारांनी आपापली भुमिका सक्षम वठवली आहे. प्रसिध्द गायक, संगीतकार अवधूत गुप्ते यांनी म्युझिक दिले असुन रिलायन्स एंटरटेनमेंट ने जगभर रिलीज करण्याची कामगिरी पार पाडली आहे .

चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांचा 2018 साली वेडा बी एफ सिनेमा प्रदर्शित झाला होता. त्याही सिनेमाला अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. त्याही चित्रपटाने वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला. वेडा BF, बेतुका, कम ऑन विष्णू, ब्रेक डाऊन धारावी कट्टा , असे एकाहून एक सरस चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अल्ताफ दादासाहेब शेख यांनी केले आहे.




## अशोक कामटे संघटना तीव्र आंदोलन छेडणार

# रेल्वे बोगद्यातील लागलेले ग्रहन केव्हा संपणार; रेल्वे प्रशासन बेफिकीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला** : मिरज रोड येथील रेल्वे भुयारी मार्गाचे लागलेले ग्रहन केव्हा संपणार असा प्रश्न येथील नागरिक सातत्याने करत आहे.

शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने या समस्यांचे निवेदन, स्मरणपत्र रेल्वे विभागीय व्यवस्थापक ,सोलापूर, सहाय्यक मंडल इंजिनिअर पंढरपूर यांना देण्यात आले. या विरोधात सांगोलाकर मोठे जनआंदोलन करणार असल्याचा माहिती शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने देण्यात आली.

या बोगद्यामध्ये दररोज वेगवेगळ्या पद्धतीने अपघाताची मालिका सुरूचआहे,ही बाब रेल्वे प्रशासनास वारंवार आंदोलने करून निदर्शनास आणून दिली तरीही गेल्या एक वर्षापासून प्रशासन केवळ चाल ढकल करत आहे. या मार्गात स्ट्रीट लाईटची सोय नसल्याने सायंकाळी अपघाताची संख्या वाढली आहे. अनेक अपघातामुळे नागरिकांनाअवयव निकामी झाल्याने या मार्गावरून प्रवास करने जिकरीचे बनले आहे.रेल्वे अंतर्गत येणाऱ्या परतेक विभाग या कामाची जबाबदारी झटकत आहे. अजुन रेल्वे प्रशासन किती सर्वसामान्य नागरीकांचा अंत पाहणार आहे. या ठिकाणी अशोक कामटे संघटना वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात येणार आहे.याठिकाणी अपघात होऊन जीवितहानी झाली तर याला पूर्णपणे रेल्वे प्रशासना जबाबदार राहील. येत्या 4 दिवसात येथील समस्येवर उपाय योजना न केल्यास शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनारेल रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याची संपुर्ण जबाबारी रेल्वे प्रशासनाची राहील.

**सोलापूर :** सोलापुरातील जुनी मिल कंपाउंड येथील दि स्केवर मॉल येथे ख़ुशी महिला गृह उद्योग समुहाच्या माध्यमातून पेन्सिल पॅकिंगचे काम देण्याचे अमिष दाखवून सुमारे 1 हजार महिलांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये प्रत्येक महिलेकडून 2100 रुपये घेऊन काही महिन्यातच समूह चालकाने गाशा गुंडाळल्याच्या तक्रारी महिलांनी प्रसिद्धी माध्यमांकडे केल्या आहेत. हजारो महिला दररोज भरलेले पैसे घेण्यासाठी हेलपाटे मारत आहेत. गाळा बंद असून संपर्कसुद्धा होत नसल्याने महिलांनी आता डोक्याला हात लावला आहे.

## स्वेरीत 'अविष्कार-२०२४' हा उपक्रम संपन्न

# स्पर्धात्मक व्यासपीठामुळे विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल -उद्योजक सुरज डोके

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** 'अविष्कार-२०२४ सारख्या स्पर्धात्मक व्यासपीठाच्या माध्यमातून संशोधनातील वेगवेगळे प्रकल्प तयार होतात. यामध्ये विद्यार्थी हे एकरूप होऊन प्रकल्पांची निर्मिती करत असताना वेगळी ऊर्जा तयार होत असते. अभियांत्रिकीच्या तिसऱ्या व चौथ्या वर्षातील विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट हे स्पर्धेच्या रूपाने साकार होत असतात. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होते म्हणून अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मनापासून सहभागी व्हावे. अभियांत्रिकी क्षेत्रात प्रोजेक्टमुळे विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होते.' असे प्रतिपादन उद्योजक सुरज डोके यांनी केले.

गोपाळपुर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या सूचनेनुसार महाविद्यालय स्तरीय 'अविष्कार २०२४' चे आयोजन केले होते. या उपक्रमाच्या उदघाटन प्रसंगी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) चे माजी विद्यार्थी व माचनूर मधील स्पार्टन सोलर टेक्नॉलॉजी कंपनीचे संचालक उद्योजक सुरज डोके हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. विशेष अतिथी म्हणून 'भारत फोर्ज कंपनी'चे एच. आर. जितेंद्र झोपे हे होते. दीपप्रज्वलनानंतर प्रा. के.पी. कौंडूभैरी यांनी प्रास्ताविकात 'अविष्कार २०२४' या एकदिवसीय संशोधनात्मक उपक्रमाबद्दल सहभागी संशोधक, स्पर्धक, प्रकल्पांचा विषय व नियम व अटी याबाबत सविस्तर माहिती दिली. भारत फोर्ज कंपनीचे एच. आर. जितेंद्र झोपे म्हणाले की, 'कोणत्याही विषयाची मूलभूत माहिती ही पक्की असेल तर प्रोजेक्ट बनविण्यास अडथळा येत नाही. अविष्कार सारख्या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळते. 'आजचे परिश्रम' हे 'उद्याचे समाधान' असते यासाठी आपल्या कामासाठी वेळ काढा आणि परिश्रम करा, याचे फळ निश्चित मिळेल.' असे सांगून कंपनीमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नेमके कोणते गुण आवश्यक असतात याची माहिती दिली. यावेळी वातानुकुलीत असलेल्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉलमध्ये अभियांत्रिकी, कॉमर्स, एमबीए, पीएच. डी. अशा पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील जवळपास ६० संशोधक स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धकांनी आपले संशोधन प्रकल्प हे पोस्टर व प्रकल्पाद्वारे अभ्यासपूर्ण मांडले होते. त्यांचे सादरीकरण देखील उत्तम पद्धतीने करत होते. यामध्ये संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी हैड्रोफोनिक चारा, प्रोव्हाईड ऑक्सिजन सप्लाय, एलीवेटर इमर्जन्सी केसेस, मोटराईजड स्टेअर एलीव्हेटर, स्मार्ट कार, रिझूलेशन मशीन लर्निंग, डिझाईन अँड अनालिसिस ऑफ मायक्रो मिक्सर्स फॉर मायक्रो प्युडीक ॲप्लिकेशन अशा विविध विषयांवर स्पर्धक संशोधनाचे सादरीकरण करत होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. दिग्विजय रोंगे यांनी काम पाहिले तर परीक्षक म्हणून संशोधन अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, डॉ. सुमंत आनंद, डॉ. बादल कुमार, प्रा. पी.ए. सातारकर व आदी तज्ज्ञ प्राध्यापकांनी काम पाहिले. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या 'अविष्कार-२०२४' या स्पर्धात्मक कार्यक्रमांमध्ये भारत फोर्ज या कंपनीचे भारत शेळके, महेश माळी, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार यांच्यासह इतर, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांना पाहुण्यांकडून सहभागी प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

## 124 वाहन चालकांवर ई-चलनाची दंडात्मक कारवाई



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने मंगळवारी सोलापूर शहरात लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे व दोन ट्राफिक अंमलदार यांच्या माध्यमातून मोबाईल टॉकिंगचे 51, ट्रिपल सीट 39, फ्रंट सीट रिक्षा चालवले 18, विना गणवेश रिक्षा चालवले 16 अशा एकूण 124 वाहन चालकांवर ई-चलनाची दंडात्मक कारवाई शहरात विविध भागात करण्यात आली आहे. तसेच या कारवाई द्वारे एकूण 2, 18, 000/- रुपये रक्कम दंड करण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली. अजूनही पोलिसांकडून कारवाई करण्याचे काम सुरु आहे.

» Selected

## डमी ईव्हीएमला लावले सलाईन



**पंढरपूर :** आपले मत आपल्या उमेदवाराला गेलेच नाही, आपली मते चोरीला गेली, असे म्हणत गादेगाव (ता. पंढरपूर) येथील काही उद्धवसेना, संभाजी ब्रिगेड, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत प्रतीकात्मक ईव्हीएम मशीनला सलाईन लावून आंदोलन केले आहे. यामुळे माळशिरसनंतर आता पंढरपूर तालुक्यात ईव्हीएम विरोधात उठाव सुरू झाल्याचे दिसून येत आहे. मारकडवाडी (ता. माळशिरस) गावाने बॅलेट पेपरवर गावात फेरमतदान घेण्याचा मंगळवारी प्रयत्न केला, गुन्हे दाखल करण्याचा दबाव टाकल्यानंतर गावकऱ्यांनी या मतदानापासून माघार जरूर घेतली.

## काँग्रेसकडे जाणार की, अजितदादा गटात राहणार

**माढा :** माढा विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीकडून मिनल साठे लढल्या. त्या सध्या माढ्याच्या विद्यमान नगराध्यक्षा आहेत. त्या काँग्रेसकडून नगराध्यक्षा बनल्या आहेत. विधानसभेच्या उमेदवारीसाठी ऐनवेळी शेवटच्या दिवशी पक्ष बदलला आणि उमेदवारी मिळविली. मात्र, त्यांचा पराभव झाला. आता साठे घराणा काँग्रेससोबत राहणार की, अजित पवार गटासोबत जाणार, याची चर्चा सुरू झाली आहे. वास्तविक पाहता यापूर्वी काँग्रेस सोडून ते भाजपमध्ये गेले होते. मात्र, काही दिवसांनी पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. माढ्यात सत्ता आणली.

## कॉमनवेल्थ स्पर्धेत आर्या यादवची कमाल



**सोलापूर :** गुजरात येथील राजकोट येथे सुरु असलेल्या 68 व्या नॅशनल स्कूल गेम्स स्विमिंग अॅण्ड डायव्हिंग या राष्ट्रीय स्पर्धेत, सोलापूरच्या श्रावणी प्रताप सूर्यवंशी हीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व कराताना डायविंग या क्रीडा प्रकारात १७ वर्ष वयोगटात खेळताना तीन सुवर्ण पदकासह हॅट्रीक साधली आहे. श्रावणी ही बाळे येथील ज. रा. चंडक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय ची विद्यार्थिनी आहे. या स्पर्धेत श्रावणी ने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले.

## रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी बावनकुळे यांची भेट



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अकलूज :** मोहिते पाटील यांच्यावर निलंबनाबाबत सोलापूर जिल्ह्यातून तक्रारी वाढत असताना चार दिवसापूर्वी आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांची भेट घेत पुष्पगुच्छ दिले होते. तो ही फोटो त्यांनी व्हायरल केला होता. राज्यात महायुती प्रचंड बहुमताने निवडून आल्यामुळे पुन्हा एकदा आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील हे भाजपशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत आहे.

## सत्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** राज्याच्या उपमुख्यमंत्री पदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांची निवड झालेबद्दल चेअरमन कल्याणराव काळे यांनी शुभेच्छा देवून सत्कार केला. याप्रसंगी मान्यवर उपस्थित होते.

## Change Name

I here declare that my old name was **Nishant Pradip Fade** and my new name is **Nishant Pradipkumar Phade** Heneceforth, I shall be known by my new name only.

**Affidevit No. MAG/SR/13675**
**Date : 03/12/2024**

## नावात बदल

आधारकार्ड, ओळखपत्र यावर माझे नाव निशांत प्रदिपकुमार फडे असे आहे. परंतु माझी मुलगी सानवी निशांत फडे हिच्या जन्म प्रमाणपत्रावर माझे नाव निशांत प्रदिप फडे असे झाले तरी आहे. तरी निशांत प्रदिपकुमार फडे व निशांत प्रदिप फडे या दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.

**Affidevit No. MAG/SR/13675**
**Date : 03/12/2024**

# 26 किलो 116 ग्रॅम वजनाचा गांजा 2 लाख 63 हजार 427 रुपयेचा मुद्देमाल जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील उंबरगावच्या एका शेतकऱ्याने आपल्या डाळिंबाच्या बागेत शासनाने प्रतिबंधित केलेल्या गांजाची बेकायदेशीर झाडांची अनधिकृतपणे लागवड केल्याने त्या ठिकाणी पोलिस पथकाने कारवाई करत सुमारे २६ किलो ११६ ग्रॅम वजनाचा प्रतिबंधित गांजा ज्याची बाजारभावाने २ लाख ६३ हजार ४२७ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याने अवैद्य धंदेवाल्यांसह शेतकऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेले अधिक माहिती अशी पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथे राजेंद्र कालिदास पवार याचे शेतात डाळिंबाच्या बागेमध्ये बेकायदेशीर पणे गांजाच्या झाडांची लागवड केल्याची माहिती पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांना गोपनीय बातमीदारांमार्फत मिळाली.

सदरच्या माहितीची खातर जमा करून त्या ठिकाणी कारवाईसाठी पंढरपूर शहर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके व स्थानिक गुन्हे शाखा तसेच शहर व ग्रामीण पोलिसांचे पथक तयार करून माहिती मिळालेल्या ठिकाणी पाठवण्यात आले.

गोपनीय खबर्या मार्फत मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पोलीस पथक पोहोचल्यानंतर त्यांनी राजेंद्र कालिदास पवार याचे शेतातील डाळिंबाचे बागेत जावून बारकाईने पाहणी केली असता तेथे ठिकठिकाणी ७ फुट ते ४ फुट उंचीची गांजाची झाडे लावलेली दिसुन आली. त्याठिकाणी एकुण १४ झाडे असलेचे तपासात निष्पन्न झाले.

दरम्यान सदर आरोपी राजेंद्र कालिदास पवार याने मौजे उंबरगाव ता. पंढरपूर येथील आपले वहिवाटीत व कब्जेत असलेल्या जमीनीतील गट नं १८६ मध्ये बेकायदेशीररित्या प्रतिबंधीत असलेला वरील वर्णनाचा २५ किलो ७६८ ग्रॅम वजनाची गांजाची झाडे व ३४८ ग्रॅम सुका गांजा असा एकंदर २६ किलो ११६ ग्रॅम वजनाचा गांजा ज्याची अंदाजे किं. रू. २ लाख ६३ हजार ४२७ रू. चा मादक उग्र वासाचा प्रतिबंधीत गांजा बेकायदेशीर अनधिकृतपणे लागवड केलेला मिळून आला. सदर ओला तसेच सुका गांजा गुन्हयाचे तपासकामी जप्त करून आरोपी राजेंद्र कालिदास पवार रा. उंबरगाव ता. पंढरपूर याचे वर पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, सपोनि भारत वाघे, सपोफौ विजय गायकवाड, शरद कदम, पोहवा. सुरज हेंबाडे, पोना सचिन इंगळे, पोशि माने, पोसई संजय राउत, नेम पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे, पोशि पाटील, पोशि मिसाळ नेम. पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे यांनी केली आहे. पोलिसांनी पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बागेत जाऊन केलेल्या कारवाईने अनेकांचे धाबे दणाणले असून यापूर्वीही पोलिसांनी अशा प्रकारे कारवाई करून संबंधितांवर गुन्हे दाखल केल्याने पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे शेतकऱ्यात खळबळ उडाली असल्याचे समजते. अधिक तपास चालू आहे.

## भूमिहिनांना 100 टक्के अनुदानावर जमीन खरेदीने देणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना 2 एकर बागायत किंवा 4 एकर जिराईत जमीन 100 टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील व कुटुंब प्रमुखाचे वय 60 वर्षापेक्षा जास्त असावे. अशा कुटुंबातील 60 वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंब प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल.

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**
**जिल्हा संधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) सोलापूर**
**जाहिर नोटीसांतर्गत निविदा सुचना क्र. 09 सन 2024-25**

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प. (ल.पा.) सोलापूर दूरध्वनी क्रमांक 0217-2727408 हे जिल्हा परिषद सोलापूर कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील कामाच्या जाहीर-नोटीसव्दारे निविदा मागवित आहेत. जाहीर नोटीसव्दारे निविदेचा कोरा नमुना जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) यांचे कार्यालयामध्ये दि. ०६/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दिनांक २०/१२/२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. परिपूर्णरित्या भरलेल्या जाहीर निविदा दिनांक २०/१२/२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत व त्यापूर्वी स्विकारण्यात येतील.

| अ. क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. लाखात | बयाणा रक्कम रु. | कामपूर्ण करणेची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किंमत रुपये | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | मौजे नंदुर ता. मंगळवेढा येथील पाझर तलाव क्र.३ नंदुर (मुलाणी शेत) या योजनेची विशेष दुरुस्ती करणे. | ९.८१ | -- | ६ | १०००/- | वर्ग -६ व त्यावरील |

उपरोक्त सर्व कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला असून कोऱ्या निविदा संच जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प. (ल.पा.) सोलापूर यांचे

१. कार्यालयामध्ये दिनांक ०६/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दिनांक २०/१२/२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.
२. उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावासमोर रकाना क्र. ४ व ६ मध्ये नमुद केलेल्या बयाणा व निविदा फी रक्कम रु. स्टेट बँक ऑफ इंडिया येथे चलनाने भरण्यात यावी. सदरची निविदा दिनांक ०६/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून दिनांक २०/१२/२०२४ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत कोऱ्या निविदा संच खरेदी करता येतील व सादर करता येतील.
३. निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
४. लिफाफा क्रमांक १ मधील सर्व कागदपत्रे जाहीर निविदामध्ये सादर करणे आवश्यक आहे. तसेच सादर केलेल्या कागदपत्रावर मक्तेदारानी स्वतःच्य सहीने (स्वाक्षरीने) साक्षांकित करुनच सादर करावी अन्यथा सदरची निविदा अपात्र करणेत येईल. ( निविदेव्दारे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्थेस काम असलेस बयाणा रक्कम सुट आहे. )
५. दिनांक १ जुलै २०१७ पासून जीएसटी (GST) या नव्या कररचनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असल्याने जीएसटी (GST) कराची तरतुद निविदा BOQ मध्ये करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**जिल्हा जलससंधारण अधिकारी**
**जिल्हा परिषद (ल.पा.) सोलापूर**

**कृषि विभाग**
**कार्यालयाचे नांव- उप-विभागीय कृषि अधिकारी, सोलापूर**
**ई निविदा सुचना क्र- बी-१ DPC/2024-25**
**कामाचे संक्षिप्त वर्णन**

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|
| १. | मौजे-होटगी-५, ता. दक्षिण सोलापूर कंपार्टमेंट बंडींग कामाचे SA41/02/03/1,2,3,6 | १४०९८३५ | १ ते ६ |
| 2. | मौजे- कळमण-६, ता. उत्तर सोलापूर कंपार्टमेंट बंडींग कामाचे SA37/01/04/1,2,4,5 | १३३५६४१ | १ ते ६ |
| ३. | मौजे-वडाळा-७, ता. उत्तर सोलापूर कंपार्टमेंट बंडींग कामाचे SA37/02/06/1,2,3,07/1 | १६५८१५२ | १ ते ५अ |
| | | ४४०३६२८ | |

उपविभागीय कृषि अधिकारी सोलापूर यांचे कडून सा. बा. वि. महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून वर नमुद केलेल्या कामाचे दि. ०९/१२/२०२४ ते २३/१२/२०२४ कालावधी करीता ऑनलाईन ब-१ निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेची सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**सही/-**
**उपविभागीय कृषि अधिकारी**
**सोलापूर**

**जिमाका/सो/जाहि/२०४/२०२४-२५**

# केंद्र विरुद्ध राज्ये

सध्या देशातील एकूण परिस्थिती पाहता आणि राजकारणातील टोकाची स्थिती पाहता केंद्र सरकार आणि देशातील विविध राज्यांमधील सरकारे यांच्यात जो कमालीचा दुरावा निर्माण झाला आहे तो चिंताजनक स्थितीत पोहोचला आहे. केंद्रीय यंत्रणांचा अनिर्बंध वापर करून विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात केंद्रीय यंत्रणा पाठवून विरोधकांना त्रास दिला जात असल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. याबाबत अनेक राज्यांची केंद्र सरकार बरोबर संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यातून हा दुरावा वाढत चालला असून 'को-ऑपरेटिव्ह फेडरलिझम'च्या तत्त्वाला तिलांजली दिली जात आहे.तुमचे राजकारण कितीही विरोधी तत्त्वांचे असो; पण केंद्र आणि राज्य सरकारांनी एकमेकांशी समन्वयानेच काम करावे अशी अपेक्षा असते, पण केंद्रातील मोदी सरकारच्या एककल्ली राजवटीमुळे हे तत्त्व मागे सारले गेले आहे. सततच असा अनुभव येत असल्याने राज्य सरकारेही आता आक्रमक भूमिकेत गेलेली दिसत आहेत. त्यातून जनताच भरडली जात आहे असे सर्रास चित्र आहे. अगदी अलीकडच्या एका प्रकरणात तामिळनाडू तेथील द्रमुक सरकारने ईडीच्या एका अधिकार्याला २० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले, त्याचा लाचलुचपत कायद्याअंतर्गत तपास पूर्ण करून त्या अधिकार्याच्या विरोधात आरोपपत्र तयार करण्यात आले आहे.परंतु हे आरोपपत्र दाखल करायला केंद्र सरकारने आडकाठी आणली आहे. केंद्र सरकार याप्रकरणी तमिळनाडू सरकारच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेली होती. पण सुदैवाची बाब अशी की सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या अधिकाराचे रक्षण करीत केंद्रीय अधिकार्यांना अटक करण्याचा राज्यांना अधिकार असल्याचा निर्वाळा दिला आहे. त्यामुळे आता विरोधकांची राज्य असलेल्या ठिकाणी केंद्रीय यंत्रणांची किंवा त्यांच्या अधिकार्यांची एकतर्फी मनमानी चालणार नाही, असे चित्र स्पष्ट झाले आहे. पण खरे पाहता राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात असे टोकाचे वितुष्ट येणे अंतिमतः लोकशाही यंत्रणेलाच मारक ठरणारे आहे. केंद्राने अनेक बाबतीत विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांच्या बाबतीत दुजाभाव केला आहे. निधी वाटपापासून राज्यांच्या करांचा वाटा वेळेवर देण्यापर्यंत अनेक बाबतीत केंद्राने विरोधकांच्या राज्य सरकारांना अक्षरशः रडवले असल्याचे ठिकठिकाणी दिसते. कर्नाटक, झारखंड, तामिळनाडू आणि दिल्ली या विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांचा अक्षरशः लक्षावधी कोटी रुपयांचा निधी केंद्राने थकवला आहे. राजकीय आकसापोटीच हा उद्योग सुरू आहे, पण त्याचा फटका त्या त्या राज्यातील जनतेच्या कल्याणकारी योजनांना बसतो आणि त्यात जनताच भरडली जाते हा सारासार विचार सध्याच्या केंद्र सरकारकडून होताना दिसत नाही. मध्यंतरी केंद्र सरकारने आमचे किती लाख कोटी रुपये अडवून ठेवले आहेत याची माहिती देणारी जाहिरात कर्नाटक सरकारने सर्व देशातील प्रमुख राजकीय वृत्तपत्रांमध्ये दिली होती. झारखंडसारख्या गरीब राज्याचे सुमारे १ लाख ३६ हजार कोटी रुपये केंद्राने अडवून ठेवले आहेत, असा आरोप होतो आहे. त्यावर समर्पक उत्तरे मिळत नाहीत. ही सगळी परिस्थिती कुठल्या दिशेने चालली आहे आणि त्याचे अंतिम परिणाम काय होणार आहेत याचा सहज अंदाज बांधता येतो. पण विद्यमान केंद्र सरकारला त्याची जराही फिकीर करावीशी वाटत नाही. ईडी, सीबीआय, एनआय या केंद्रीय यंत्रणांचा देशभरातील उच्छाद विरोधकांसाठी खूप त्रासदायक ठरत आहे. त्या विरोधातही विरोधी पक्षांची राज्ये आता आक्रमक भूमिका स्वीकारत आहेत. पश्चिम बंगालमध्ये ईडीच्या सततच्या कारवायांच्या विरोधात तेथील राज्य सरकार आक्रमक झाले आहे. ईडीच्या कारवायांना पायबंद घालण्याच्या उपाययोजना त्यांनी सुरू केल्या आहेत. अनेक राज्यांनी सीबीआयला आपल्या राज्यात प्रवेश नाकारला आहे. ही सगळी परिस्थिती पाहिल्यानंतर भारतीय संघराज्य व्यवस्था किती सुस्थितीत आहे याची आपण कल्पना करू शकतो. तमिळनाडूसारख्या घटनेकडे पाहता असे लक्षात येते की, ईडीच्या अधिकार्याला २० लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडल्यानंतरही त्याच्यावर कारवाई करण्याचा अधिकार त्या राज्य सरकारला नसेल तर मग कशालाच अर्थ उरत नाही. एकमेकांच्या अधिकार क्षेत्रात हस्तक्षेप करण्याने केंद्र आणि राज्य सरकारांचे संबंध दिवसेंदिवस असेच बिघडत जातील. खूप वर्षांपूर्वी केंद्रात जेव्हा काँग्रेसची एकहाती सत्ता होती त्यावेळीही केंद्राच्या हस्तक्षेपाबाबत राज्य सरकारकडून वारंवार तक्रारी येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्य सरकारांचे परस्परसंबंध आणि एकमेकांचे अधिकार यावर शिफारशी करण्यासाठी राजेंद्रसिंह सरकारीया या सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला गेला होता. सरकारीया आयोग म्हणून हा आयोग प्रसिद्ध आहे. या आयोगाने ज्या शिफारशी केल्या होत्या त्या बरहुकूम नंतर देशाचा कारभार चालला, पण आता सरकारीया आयोगाच्या या शिफारशी पद्धतशीर बासनात गुंडाळल्या गेल्या आहेत. सरकारीया आयोगाने एकूण २४७ शिफारशी केल्या आहेत. त्या सगळ्या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्याचे तंतोतंत पालन झाले, तर भारतीय संघराज्य सुनियोजित पद्धतीने चालू राहू शकेल, पण तसे होताना दिसत नाही. सरकारीया आयोगाची एक महत्त्वाची शिफारस अशी होती की केंद्र सरकारने कोणत्याही राज्याचा राज्यपाल नियुक्त करताना, त्या राज्यांचे मुख्यमंत्री, उपराष्ट्रपती आणि लोकसभेचे सभापती यांच्याशी सल्लामसलत करून राजकारणी नसलेल्या व्यक्तींची राज्यपालपदी नियुक्ती करावी. ही नियुक्ती करताना राज्य सरकारला त्या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे ही सरकारीया आयोगाची शिफारस आज कोठे अंमलात आणली जाते? केंद्र सरकारने राज्यपालांमार्फत आपले हस्तकच विविध राज्यांमध्ये नियुक्त केले आहेत आणि हे हस्तक विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये जो उपद्रव माजवत आहेत त्याच्या कहाण्या वर्तमानपत्रात नियमित छापून येतात. त्याविषयीचे अनेक खटलेही सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेले आहेत. ही सगळी विदारक स्थिती पाहता केंद्र सरकारने देशाच्या अखंडतेसाठी आणि सुनियोजित लोकशाही प्रक्रियेसाठी सरकारीया आयोगाच्या शिफारशींकडे पुन्हा एकदा कटाक्षाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक निकालाचे राजकीय-सामाजिक विश्लेषण आणखी काही काळ होत राहील. पण ते करत असतानाच नव्याने स्थापन होणाऱ्या सरकारपुढील आव्हानांचा वेध घेणेही तितकेच आवश्यक आहे. शेती, उद्योग, रोजगार, आरोग्य, शिक्षण, कुपोषण, बालमृत्यू यांसह अनेक क्षेत्रात उभ्या असलेल्या आव्हानांचा सामना नवनियुक्त शासनाला करावयाचा आहेच; पण त्यापेक्षाही महत्त्वाचे आव्हान आहे ते सभ्य, सुसंस्कृत आणि विवेकी महाराष्ट्राची उभारणी करण्याचे. त्याशिवाय आर्थिक विकासाच्या आणि प्रगतीच्या आलेखाला परिपूर्णता लाभणार नाही.**

# नव्या सरकारपुढे आव्हान पुनर्रचनेचे

प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर

मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' असे समर्थ रामदासांनी म्हटले होते. त्यांच्या या प्रसिद्ध कवनामध्ये महाराष्ट्रधर्म म्हणजे महाराष्ट्राची कल्याणकारी दृष्टी हे होय. अगदी मध्ययुगातील गुरुचरित्रापासून वि. का. राजवाडे यांच्या ऐतिहासिक खंडापर्यंत आणि पुढे प्रा. गं. बा. सरदार यांच्या प्रगतीशील ग्रंथापर्यंत महाराष्ट्र धर्म या संकल्पनेची चर्चा केलेली दिसते. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या 'महाराष्ट्र संस्कृती' या ग्रंथातही महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा ऊहापोह करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीसुद्धा महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा प्रगतीशील, आधुनिक अर्थ सांगत असत. एक मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राची प्रशासकीय घडी भक्कमपणे उभारली. त्यांनी महाराष्ट्रात शेती, सहकार, उद्योग, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांची दूरदृष्टीने पायाभरणी केली. यशवंतरावांपासून ते शंकरराव चव्हाण, मनोहर जोशी यांच्यापर्यंत महाराष्ट्रातील सर्व मुख्यमंत्र्यांनी ही महाराष्ट्र संस्कृती जोपासण्याचा, टिकवण्याचा आणि वाढवण्याचा प्रयत्न केला. परंतु गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राचे राजकारण इतके गढूळ बनले की कधी कधी तर बिहारलाही महाराष्ट्राने मागे टाकले की काय असे लोकांना वाटू लागले. त्यामुळे आता महाराष्ट्रात सत्तेत येणाऱ्या नव्या सरकारपुढे सर्वांत मोठे आव्हान कोणते असेल तर ही महाराष्ट्र संस्कृती अधिक प्रगतीशील, सौजन्यपूर्ण आणि विकासाभिमुख बनवणे.

लोकसंख्येबाबत देशात दुसऱ्या क्रमांकावर असलेला आणि आर्थिक प्रगतीबाबत देशात अग्रस्थानी असलेला महाराष्ट्र आज एका नव्या बिकट वळणावर उभा आहे. देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १३ टक्के आहे. देशात होणाऱ्या थेट विदेशी गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. २०२४ मध्ये राज्यात ७०७ अब्ज डॉलरची थेट विदेशी गुंतवणूक झाली असून देशात आलेल्या एकूण एफडीआयच्या तुलनेत हे प्रमाण ५२.४६ टक्के आहे. तथापि, परकीय गुंतवणूक आल्यानंतर ती टिकवण्यासाठी आवश्यक पायाभूत संरचनेचा विकास, राजकीय स्थैर्य आणि उद्योगांना प्रगतीशील वाटचाल करण्यासाठी इकोसिस्टीम विकसित करण्यात आपल्याला किती यश आले, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. यामध्ये आपण कमी पडल्यामुळे राज्यातील उद्योग शेजारच्या राज्यांकडे आकृष्ट होताहेत. हा धोका टाळण्यासाठी महाराष्ट्राला संयत, स्थिर आणि कार्यक्षम प्रशासनाची गरज आहे. असे प्रशासन देण्यासाठी आवश्यक अशा धोरणात्मक व्यूहरचनांची आखणी करावी लागेल. पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी गुजरातसारख्या राज्याने ३०-४० वर्षांपूर्वीच स्वतंत्र संस्था निर्माण केली. तशी संस्था आता महाराष्ट्रात विद्यापीठ स्वरुपात निर्माण करण्याची गरज आहे. कारण आजघडीला राज्यातील शेती, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बंद पडणारे आजारी उद्योग, शिक्षणाची हेळसांड, आयटी सिटी म्हणून पुण्याचा बंगळुरु आणि हैदराबादच्या तुलनेत करावयाच्या विकासाची दिशा या सर्व बाबींमध्ये आपण कमी पडत आहोत की काय असे प्रश्न निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर स्टँड अलोन विद्यापीठ गुजरात, कर्नाटक किंवा चेन्नई आदी भागांत जशी निर्माण झाली आहेत तशी महाराष्ट्रात निर्माण करावी लागतील. महाराष्ट्रात प्रगत माहिती-तंत्रज्ञानाप्रमाणे संस्कृती, पर्यटन, पुरातत्व याबाबत समृद्ध वारसा लाभलेला आहे. परंतु राज्यात पर्यटन आणि पुरातत्वासाठी स्टँड अलोन विद्यापीठ नाही. त्यासाठी तातडीने पावले टाकण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकोटांना जागतिक वारसा मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने प्रस्ताव दाखल केलेला आहे. पण केवळ प्रस्तावाने प्रश्न सुटणार नाही, तर अशा प्रकारचे साहित्य, व्हिडिओ प्रकाशने, चित्रपट या माध्यमातून जगातील पर्यटक आपल्याला महाराष्ट्राकडे आकर्षित करता येतील. महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे प्रगत रेल्वेसेवा, विमानसेवा, रस्तेमार्गांनी जोडली जाणार नाहीत तोवर जगभरातील आणि देशातील पर्यटक महाराष्ट्राकडे कसे वळणार? पर्यटन ही सोन्याची खाण आहे. असे असताना महाराष्ट्राचे या क्षेत्राकडे जितके दुर्लक्ष झाले तेवढे देशातील एकाही राज्याचे झाले नसेल. त्यामुळे पर्यटन विकासासाठी बृहद्आराखडा तयार करण्याची गरज आहे. याखेरीज शेती आणि उद्योगांमध्ये नव्या उपक्रमांची व नव्या प्रयोगांची आखणी करताना आपल्याला सहकार चळवळीला ऊर्जितावस्था कशी देता येईल, याकडे सर्वाधिक लक्ष द्यावे लागेल. बिगरराजकीय दृष्टीने सहकारातील क्षमतांचा सर्वांगिण विकास करण्यात आपणास यश आलेले नाहीये. देशातील सहकार विद्यापीठ पुण्यात साकार होणार आहे. या विद्यापीठाच्या उभारणीसाठी आवश्यक अशा प्रयत्नांची दूरदृष्टीने व योजकतेने मांडणी व आखणी करावी लागेल. सहकारातील नव्या उपक्रमशीलतेला प्रगत माहिती-तंत्रज्ञानाची जोड देण्याचे आणि सहकारातून समृद्धीकडे वाटचाल करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांचे जे धोरण आहे त्यास सुसंगत अशा पावलांची महाराष्ट्राला गरज आहे. नव्या सरकारला याबाबत पुढाकार घ्यावा लागेल. गेल्या काही वर्षांत वाढत चाललेले शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण गंभीर आणि चिंताजनक आहे. ते कमी करण्यासाठी राज्यातील जिरायत शेती आणि बागायत शेती यांच्यात समन्वय आखण्याची गरज आहे. राज्यातील शेतीवरील प्रक्रिया उद्योग आणि लघु व मध्यम उद्योग यांची पुनर्रचना करण्याची गरज आहे. राज्यातील सहा मोठ्या नगरांमध्ये केंद्रीभूत झालेला उद्योग-व्यवसाय इतर मागास आणि विकसनशील विभागांमध्ये विकेंद्रित करावा लागेल. किर्लोस्कर, टोयोटो यांचा ऑटोमोबाईल प्रकल्प संभाजीनगरमध्ये येणार असे पडघम वाजत आहेत. पण परदेशातून येणाऱ्या उद्योगांमध्ये इथल्या भूमीपुत्रांना रोजगार मिळणार का असा प्रश्न पडतो. याखेरीज नव्या-जुन्या उद्योगांमधून होणाऱ्या प्रदुषणाबाबतही आज हवामान बदलांच्या काळात गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. शिक्षणाच्या क्षेत्राबाबत महाराष्ट्राची स्थिती काय आहे, हे 'असर'च्या अहवालांनी वारंवार दाखवून दिलेले आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अमलबजावणी करताना पारंपरिक व आधुनिक शिक्षणाची सांगड घालत रोजगाराभिमुख शिक्षणाला चालना दिली गेली तर मराठी तरुण-तरुणी वैश्विक पटलावर उंच भरारी घेऊ शकतील. जागतिक उद्योगांचे साहित्य संमेलन मनोहर जोशींच्या काळात तीन वेळा महाराष्ट्रात झाले. पण नंतर आरंभशूर उपक्रम बंद पडले. वास्तविक, जागतिक पातळीवरील यशस्वी मराठी उद्योजकांच्या मार्गदर्शनाने इथल्या नवतरुणांमधील उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न व्हायला हवेत. त्यादृष्टीने मेगा महाराष्ट्र इंडस्ट्रीयल समीट ही परदेशात नव्हे तर महाराष्ट्रातील एखाद्या ग्रामीण भागात आयोजित करुन तेथून जगातील उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी आकर्षित करण्याची गरज आहे.

नव्या कार्यसंस्कृतीचे आव्हान - महाराष्ट्रात स्थापन होणाऱ्या नव्या सरकारपुढे खरे आव्हान आहे ते आपल्या खंडित झालेल्या परंपरेमध्ये नवचैतन्य आणण्याचे. २००० सालापर्यंत प्रगती आणि विकासाचा जो समन्वय होता, तो समन्वयाचा रथ कुठे तरी अडखळला आहे. त्यातून निर्माण झालेल्या विसंवादामुळे महाराष्ट्रात विकासाला खिळ बसली. ती दूर करण्यासाठी आता गरज आहे ती सुशासनाची. यासाठी टीकाटिप्पणीपेक्षा सुसंवादाची गरज आहे. घसरलेल्या राजकीय- सामाजिक संस्कृतीमध्ये परिवर्तन करण्याची गरज आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'महाराष्ट्र समाजाची स्थिती' या लेखामध्ये असे चित्र रंगवले होते त्यामध्ये इथल्या जाती आणि ज्ञातींविषयीच्या मर्यादा विषद केल्या होत्या. काळ पुढे सरकला,परंतु आजही त्याच मर्यादांमध्ये महाराष्ट्र अडखळतो आहे की काय असे वाटते. जोपर्यंत महाराष्ट्र संकुचित जातीभावनांच्या खेळातून बाहेर पडून विशाल आकाशाकडे मानवी गुणवत्तेच्या दृष्टीने पहात नाही तोपर्यंत महाराष्ट्रात रचनात्मक कार्याचा गाडा पुढे जाणार नाही. यासाठी धोरणकर्त्यांची आणि एकंदरीतच राजकीय नेत्यांची जबाबदारी मोठी आहे. मराठा, इतर मागासवर्गीय, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक या सर्व समाजघटकांमध्ये उसवत चाललेली वीण पुन्हा घट्ट केल्याशिवाय आर्थिक विकासाच्या आकड्यांना परिपूर्णता येणार नाही. आज दुर्दैवाने महाराष्ट्रात विवेकभाव कुठे तरी हरपला आहे की काय असा प्रश्न पडतो. तेव्हा विवेकी, सभ्य, सुंस्कृत, स्त्री-पुरुष समानता मानणारा, शिव-शाहू फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र पुन्हा उभा करण्यासाठी नव्या शासनाला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. अन्यथा महाराष्ट्राचा विकासवेग देशात पहिल्या क्रमांकावर येईल, महाराष्ट्र वन ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होईल, एफडीआयमध्ये अग्रस्थानी राहील; हे सारे शक्य होईल; पण त्यापेक्षा महत्त्वाचे आहे ते सभ्य, सुसंस्कृत आणि विवेकी महाराष्ट्राची उभारणी.

## गुड मॉर्निंग

दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

**शुक्रवार, दिनांक ६ डिसेंबर २०२४,** मार्गशीर्ष शु. ५, श्रवण. श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन. नागपूजन, नाग दिवे. क्रांतीसिंह नाना पाटील पुण्यदिन. नक्षत्र : श्रवण, योग : ध्रुव, करण : कौलव. सूर्योदय : स.०६.४० सूर्यास्त : सायं.०५.३० वा. **राहू काळ : दुपारी : १:३० ते ३:००**

**दिनविशेष**

▶१७३२ : ईस्ट इंडिया कंपनीचा पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याचा जन्म. ▶१८२३ : भारतात 'मोक्षमुल्लर भटजी'म्हणून प्रसिद्ध असलेल्या जर्मन संस्कृत पंडिताचा जन्म. ▶१८३६ : गॅसच्या दिव्याचा रसायनशास्त्रीय अभ्यासक फ्रेड्रिक चॅंडलरचा जन्म. ▶१८६१ : कवी नारायण वामन टिळक यांचा जन्म. ▶१८७७ : थॉमस एडिसनद्वारा सर्वप्रथम आवाजाचे ध्वनिमुद्रण करण्यात यश. ▶१९१५ : नटवर्य जयराम शिलेदार यांचा जन्म. ▶१९५६ : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण. ▶१९७१ : भूवैज्ञानिक, मराठी विश्वकोशाच्या विज्ञान कक्षेचे प्रभारी विभाग संपादक, शिक्षक व प्रशासक कमलाकांत वामन केळकर यांचे निधन. ▶१९७६ : बेचाळीसच्या लढ्यातील पत्री सरकारचे नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांचे निधन. ▶१९९२ : कारसेवकांनी अयोध्येतील बाबरी मशिद उध्वस्त केली.



**राशीभविष्य**

▲ **मेष** : नवीन ओळखी होतील. ▲ **वृषभ** : कमी श्रमात जास्त यश. ▲ **मिथुन** : पैशाची चिंता मिटेल. ▲ **कर्क** : अनपेक्षित खर्च होईल. ▲ **सिंह** : विशेष भत्ते मिळतील. ▲ **कन्या** : मेजवानीचा योग. ▲ **तुळ** : महत्वाचे निर्णय घ्याल. ▲ **वृश्चिक** : स्थावराचे व्यवहार उरका. ▲ **धनु** : आनंददायक दिवस. ▲ **मकर** : कामात दिरंगाई होईल. ▲ **कुंभ** : प्रिय व्यक्तीचा सहवास लाभेल. ▲ **मीन** : राग आवरा.

**चिंतन**

ज्या कर्तृत्वात हृदयात जिव्हाळा नाही ते कर्तव्य कितीही चांगल्याप्रकारे केले तरी जगाला जिंकू शकणार नाही. पण हृदयात अपार सेवा भरली की सर्वत्र चांगुलपणा आणि मित्रच दिसतात.

**- साने गुरुजी**

**व्यक्तीविशेष**

### क्रांतिसिंह नाना पाटील

क्रांतिसिंह नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) जि. सांगली येथे झाला. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात सत्यशोधकी चळवळीतून त्यांचे कर्तृत्व फुलत गेले. शेतकरी, कष्टकऱ्यांच्या राज्याचे स्वप्न उरी बाळगून महात्मा गांधींचे नेतृत्व मानून ते राजकीय चळवळीत उतरले. सत्यशोधकी चळवळीतून गांधीवादाकडे ओढल्या गेलेल्या नानांच्या नजरेसमोर होती आदर्श अशी ग्रामराज्य. या आदर्शवादी स्वप्नातूनच स्वयंपूर्ण शासन अस्तित्वात आणण्यासाठी त्यांनी प्रतिसरकार उभारले. त्याच्या रक्षणासाठी तुफान सेना उभारली. नानांच्या या प्रतिसरकारने साक्षरता, कर्ज आणि व्यसनमुक्ती, गांधीग्लान, विधवा विवाह, हुंडाबंदी, बालविवाह बंदी असे अनेक सामाजिक उपक्रम राबवले. साडे चार वर्षे चालविलेल्या या प्रतिसरकारमुळे नानांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती दंतकथा आणि अद्भूततेचे वलय निर्माण झाले. ते क्रांतिसिंह झाले. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्योत्तर काळात मात्र त्यांची निराशा केली. मग त्यांचा राजकीय प्रवास नवजीवन संघटना, किसान पक्ष या मार्गावरून कम्युनिस्ट पक्षापर्यंत झाला. पण सामाजिक कार्यात मात्र म. फुळे, राजर्षी शाहूंचा वारसा मात्र त्यांनी प्रामाणिकपणे जपला. दि. ६ डिसेंबर १९७६ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांचे निधन झाले.

**बोधकथा**

### काम करा आवडीनं

त्याचं उत्तर ऐकून यात्रेकरू तिसऱ्या कारागिराजवळ गेला आणि त्यालाही विचारलं. तिसरा कारागिर म्हणाला, 'बसा इथं. कुठून आलात? पाणी हवंय का? अहो, इथं एक मंदीर उभारलं जातंय. आमच्या आईवडिलांची पुण्याई आणि मागच्या जन्मी काहीतरी चांगलं केलं असेल म्हणून या मंदिराच्या उभारणीतील हे काम आम्हाला मिळालं. जन्माचं सार्थक झाल्यासारखं वाटतंय बघा. समदी देवाची कृपा हाय बघा.' त्याचं उत्तर ऐकून यात्रेकरूला मनापासून आनंद झाला. त्यानं जवळ असलेलं गोडधोड अन्न त्या तिसऱ्या कारागिराला दिलं आणि तो निघून गेला.

**तात्पर्य : आवडीचं काम मिळेलच असं नाही. म्हणूनच जे काम मिळेल ते आवडीनं करा.** (उत्तरार्ध)

**जिज्ञासा**

### सुरक्षित स्फोटकांचा शोध

त्यांनी निर्माण केलेल्या ब्लास्टिंग जिलेटीन या स्फोटकाची निर्मितीही अशाच एका प्रयोगादरम्यान नकळतपणे झाली. हा शोध अपघातानेच लागला. एकदा नोबेल हे त्यांच्या प्रयोगशाळेत प्रयोग करत असताना त्यांच्या बोटाला जखम झाली. त्यांनी त्यावर कोलोडीन नावाचे रसायन लावले आणि थोड्या वेळाने बघता तो जखमेवर एक पापुद्रा तयार झाला होता आणि रक्त येणे थांबले होते. हीच युक्ती त्यांनी नायट्रो ग्लिसरिन या द्रवाचे घनरुपात परिवर्तन करण्यासाठी वापरण्याचे ठरवले. त्यांनी या द्रवामध्ये कोलोडीन टाकून जिलॅटिन मिळवले आणि हाताळण्यासाठी अतिशय सुविधाजनक असणाऱ्या नव्या स्फोटकाचा जन्म झाला. खडक फोडण्यासाठी या स्फोटकाचा वापर होऊ लागला. स्फोट करून खडक फोडण्याची प्रक्रिया होत असल्याने नोबेल यांनी या स्फोटकाला ब्लास्टिंग जिलेटीन असे नाव दिले. यातून मिळालेल्या संपत्तीचा विनियोग संशोधन कार्यासाठी काम करणाऱ्यांना व्हावा म्हणून त्यांनी अशांना पारितोषिक देण्याची इच्छा व्यक्त केली होती. (उत्तरार्ध)

**सामान्यज्ञान**

### दोस्ती संगणकाशी

त्यामुळे अलीकडे 'रार' वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. पण 'रार' फाईल्स पाठवताना एक काळजी घेणं आवश्यक असतं ती म्हणजे आपण ज्याला 'रार' स्वरुपात फाईल पाठवणार आहात त्याच्याकडे जर हे सॉफ्टवेअर नसेल तर ती फाईल त्याला ओपन करता येत नाही. झिपच्या बाबतही तसेच असते. मात्र अलीकडे बहुतांश संगणकांवर एक्सपी किंवा त्यापुढील ऑपरेटिंग सिस्टीम असल्यामुळे झिप फाईल्स ओपन करता येतात.

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५२०**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | | | 1 |
| | 1 | 3 | |
| | 4 | 1 | |
| 1 | | | 3 |

**क्रमांक ५१९ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 1 | 4 | 2 |
| 4 | 2 | 1 | 3 |
| 1 | 3 | 2 | 4 |
| 2 | 4 | 3 | 1 |

**हास्यविनोद**



बराच वेळ स्टेशनवर रेल्वेची वाट पाहून वैतागलेल्या राधिकाबाईंनी अखेर तावातावाने चौकशी कक्षाच्या मुख्य अधिकाऱ्याकडे धाव घेतली. रागारागाने त्या म्हणाल्या, 'काय हो साहेब, या तुमच्या ट्रेन नेहमीच जर लेट होणार असतात, तर वेळापत्रक ठेवता कशाला हो.' राधिकाबाईंच्या रागीट चेहऱ्याकडे पहात साहेबानं शांतपणे उत्तर दिलं, 'बाई, वेळापत्रक नसतं तर आपल्याला कळणार कसं की ट्रेन लेट आहे ते? ते कळावं म्हणूनच वेळापत्रक ठेवलं आहे.'

शाळेत जगाचा नकाशा विकत घेण्याबाबत सांगण्यात आल्यानंतरही अशोकने नकाशा न घेतल्याचे पाहून सुरेशने त्याला विचारले, अरे अशोक, तू जगाचा नकाशा अजून नाही घेतलास ? **अशोक :** हो नाही घेतला. कारण आपले सर म्हणतात, 'रोज जग बदलत आहे. म्हणून म्हटलं मग घाई कशाला करायची?'

**महिलायन**

### मुलांना ॲलर्जीचा त्रास आहे ?

तपासणी भारतातही केली जावू लागली आहे. ही तपासणी करून संबंधित खाद्यपदार्थ, प्रतिकूल वस्तू किंवा वातावरण यांपासून आपण दूर राहून ॲलर्जीचा दुष्प्रभाव कमी करू शकतो. ॲलर्जीपासून बचाव करण्यासाठी फळ किंवा तीव्र गंध असणाऱ्या वस्तूंपासून दूर राहणेच चांगले. घरात रंगकाम किंवा पॉलिशचे काम चालू असेल तर मुलांना त्याच्या जवळ घेऊन जावू नये. बेडरूमसाठी हॅपा फिल्टर्स किंवा आयनिक फिल्टरचा वापर करावा.

ॲलर्जी असणाऱ्या मुलांना ॲण्टी हिस्टामिनचे औषध द्यावे लागते. नाकात दीर्घ काळापर्यंत स्टेरॉईड्सचे स्प्रे टाकावे लागतात. यामुळे काही नुकसान होत नाही. भारतात सध्या इम्यूनो थेरपीदेखील उपलब्ध आहे. यामुळे ॲलर्जीचा त्रास बरा तर होतोच पण दम्याच्या त्रासापासूनही बचाव होतो. अलीकडे इम्युनो थेरपी ओरल ड्रॉप्समध्येदेखील उपलब्ध आहे. अर्थात, कुठलाही इलाज करताना आपल्या संबंधित बालरोग तज्ज्ञांशी जरूर सल्ला मसलत करावी. आपल्या मुलांना आपण ॲलर्जीपासून सहज दूर ठेवू शकतो. मुलांना जर ॲलर्जी असेल तर त्याबद्दलची माहिती त्यांच्या शाळेतील शिक्षकांना, क्लासला जात असल्यास तेथील संबंधितांना आजूबाजूच्या लोकांना आवश्य सांगावे. म्हणजे अचानक काही त्रास उद्भवल्यास त्वरीत इलाज करणे सोपे जाते.

(उत्तरार्ध)

**गंमतग्यान**

### सुगंध देणारे मोबाईल कव्हर

बालमित्रांनो, आतापर्यंत सुगंधी रबर, सुगंधी पेन्सिल, सुगंधी पेन यांचा वापर तुम्ही केला असेल. परंतु तुमच्या मोबाईलवरून तुम्ही कोणाला कॉल केला किंवा तुम्हाला कोणाचा फोन आला आणि त्यामुळे सगळीकडे सुगंध पसरला तर ? ही कल्पना कदाचित गमतीची वाटेल पण ही आता सत्यात उतरली आहे. मोबाईलसाठी कव्हर बनवणाऱ्या एका कंपनीने मोबाईलचे अशा प्रकारचे कव्हर तयार केले आहे. त्यामध्ये तऱ्हेतऱ्हेचे सुगंध सामील केले आहेत. याद्वारे स्ट्रॉबेरी, चीज केक, व्हेरी चेरी, ब्ल्यू बेरी, लिकोरीस आणि बेरी ब्ल्यू या प्रकारांपैकी आवडीचे सुगंध आपल्याला निवडता येणार आहेत. कंपनीने या सुगंधीत मोबाईल कव्हर सोबत विशिष्ट जेली बीन आकाराचे इयर फोनही तयार केले आहेत. त्यांचे रंग या पाच सुगंधाशी मिळते-जुळते आहेत. हा सुगंध फक्त मोबाईल केसमध्येच आहे. विशिष्ट प्रकारच्या ड्युरेबल प्लास्टिकपासून ते बनवले गेले आहेत आणि बनवतानाच त्यात सुगंध टाकण्यात आला आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

### शालेय शिक्षण विभागाचा निर्णय, १० पेक्षा कमी पटसंख्या असल्यास

# जिल्हापरिषद शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक भरती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये आता डीएड किंवा बीएड पूर्ण केलेल्या तरुण-तरुणींना कंत्राटी शिक्षक म्हणून नेमले जाणार आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक नेमले जाणार असून त्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडेच उमेदवाराला अर्ज करावा लागणार आहे



दहापेक्षा कमी पटाच्या शाळांमधील कार्यरत शिक्षकांची नेमणूक आता जिल्हा परिषदेच्या दुसऱ्या शाळांमध्ये (ज्या शाळांमध्ये पटसंख्या अधिक आहे, पण शिक्षक कमी असलेल्या ठिकाणी) केली जाणार आहे. समग्र शिक्षा अभियानातून या कंत्राटी शिक्षकांचे मानधन दिले जाणार आहे. कंत्राटी शिक्षक नेमण्याचा अधिकार प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना असून ते जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांना नेमणुका देतील.

**दरमहा १५ हजार रुपयांचे मिळणार मानधन**

● दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आता डीएड-बीएड शिक्षण झालेल्या तरुण-तरुणींना नियुक्ती दिली जाणार आहे. त्यांना नियुक्तीवेळी हमीपत्र द्यावे लागणार असून नियुक्तीनंतर पुन्हा त्या जागेवर कायम करण्याची मागणी ते करू शकणार नाहीत. सुरवातीला त्यांची नियुक्ती एका वर्षासाठी असणार आहे. ज्यांचे काम समाधानकारक वाटेल, त्यांना पुढे त्याठिकाणी मुदतवाढ दिली जाणार आहे. राज्यभरात डिसेंबरनंतर कंत्राटी शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरु होणार आहे.

# खडकीत शेतकऱ्याने घेतले मुळ्याचे पीक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात खडकी गावातील युवा शेतकरी शिवाजी चंद्रकांत वाबळे यांनी मुळ्याचे यशस्वी पीक घेतले आहे. सध्या मुळ्यांना तीस रुपये किलो असा बाजारभाव मिळत आहे. हा बाजारभाव शेतकऱ्यांना परवडत आहे.

तालुक्याच्या पूर्व भागात मुळ्याचे पिक सहसा शेतकरी घेत नाहीत. परंतू खडकी येथील युवा शेतकरी शिवाजी वाबळे यांनी मुळ्याचे यशस्वी पिक घेतले आहे. ते दहा ते बारा वर्षांपासून मुळ्याचे पिक घेत आहेत. या परिसरात मळा विक्रीसाठी खुला बाजार नसल्याने वाबळे हे मुळ्याचे पिक मुंबई येथील मॉल मध्ये विक्रीसाठी पाठवतात. तेथे त्यांना चांगला बाजारभाव मिळतो. एक महिन्यापूर्वी मुळ्यांना किलोला ५० रुपये बाजारभाव व एक मुळ्याच्या नगाला १० रुपये भाव मिळत होता. त्यानंतर आता बाजारभावात थोडी घसरण झाली आहे. सध्या किलोला ३० रुपये व नगाला ६ रुपये बाजारभाव मिळत आहे. हा देखील बाजारभाव परवडत असल्याचे शिवाजी वाबळे यांनी सांगितले.





**मुळ्याचे सेवन आरोग्यासाठी फायदेशीर**

● मुळा खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असते. यात कर्बोदके, फॉस्फरस, लोह, प्रथिने मोठ्या प्रमाणावर असतात . मुळ्याची पाने, रस सेवन केल्यास रक्तातील साखरेची पातळी कमी होते. अन्नाचे पचन चांगले होते. पानांमध्ये फायबर असते. त्याचा त्वचेसाठी चांगला उपयोग होतो.

# आपसातील हेवेदावे बाजूला करून एकत्र येऊ : संजय जगताप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठीच लढून विधानसभेचा पराभव पुसून टाकू. येणारी वर्षे तुमची असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तुम्ही दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्याचे काम करणार आहे. पराभव झाला असला तरी जनतेने एक लाखांहून अधिक मतदान करून भक्कम साथ दिली आहे. यापुढेही सामाजिक कामांच्या माध्यमातून जनतेची कामे करू. महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील सर्व नेते, कार्यकर्त्यांनी परीश्रम घेतले त्याबद्दल सर्वांचे आभार मानण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, हा पराभव आगामी निवडणूकांची नांदी आहे. मला ही निवडणूक जिंकता आली नसली, तरी तुम्हाला विजयी करण्याची ताकद माझ्यात आहे. यासाठी आपसातील हेवेदावे बाजूला करून सर्वांनी ताकदीने एकत्र येऊ, असे आवाहन पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप यांनी केले. सासवड येथे आयोजित आभार मेळाव्यात माजी आमदार संजय जगताप बोलत होते.

ते म्हणाले की, ५ टक्के म्हणजे २१ व्हीव्हीपॅट मधील चिठ्ठ्या मोजण्याबाबत निवडणूक आयोगाकडे अर्ज केला आहे. काही झाले तरी पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणूकांत या ठिकाणी दुसऱ्या कोणालाही निवडून येऊ देणार नाही. आपण स्व. चंदुकाका जगताप यांचे वारसदार असून पराभवाने न खचता लढणे आपल्या रक्तात आहे. त्यामुळे मी खचलो नाही. पुन्हा नव्या उभारीने जनतेत येत आहे. कोणत्याही निवडणूका अवघड नाहीत. आपली संस्थात्मक रचना मजबूत असल्याचे माजी आमदार संजय जगताप यांनी स्पष्ट केले.

**आत्मचिंतन**

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सासवड :** येथे आयोजित आभार मेळाव्यात माजी आमदार संजय जगताप बोलत होते

**Selected**

## पोलिसांनी वाचवले ९ वासरांचे प्राण

**शिक्रापूर :** तळेगाव ढमढेरे येथील धानोरे रोड येथून कत्तलीसाठी वासरे घेऊन चाललेल्या टेम्पोला अडवून टेम्पोतील कत्तलीसाठी चाललेल्या नऊ वासरांचे प्राण बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने वाचविण्यात पोलिसांना यश आले. पोलिसांनी वासरांची वाहतूक करणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल केला आहे. शिक्रापूर येथे पोलीस कर्मचारी वाहतूक नियमनाचे काम करत असताना तळेगाव ढमढेरे धानोरे रस्त्याने एमएच १२ एसएक्स ०८०६ या पिकअप वाहनातून काही वासरे कत्तलीसाठी जात असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांना दिली. पोलीस हवालदार अमोल नलगे, पोलीस शिपाई राजेंद्र काळे यांनी सदर ठिकाणी धाव घेतली. मात्र, यावेळी काही कार्यकर्ते वाहनाच्या आजूबाजूने ये जा करत असल्याचे लक्षात येताच चालक पिकअप वाहन रस्त्यावर उभे करुन पळून गेला. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने वाहनातील नऊ वासरांची सुटका करत सर्व वासरे लोणीकंद येथील गोशाळेत दाखल करत वासरांना जीवदान दिले. याबाबत पोलीस शिपाई राजेंद्र हरिश्चंद्र काळे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

## लिकेजच्या कारणावरून जीवे मारण्याची धमकी; दोन भावांवर गुन्हा

**चाकण :** तुम्ही आमचे वरील रूमचे फिलिंगचे काम केले तरीही आमच्या रूमचे लिकेज बरोबर झाले नाही, अजून लिकेज आहे, असे म्हणून दोन भावंडांनी चिडून एका बांधकाम व्यवसायिकास शिवीगाळ व दमदाटी करत तुम्ही धंदा कसा करता, तुम्हांला मारून टाकतो अशी धमकी दिल्याचीघटना समोर आली आहे. खेड तालुक्यातील नाणेकरवाडी हद्दीतील दत्त पॅराडाईज बिल्डिंग समोरील सेल्स कार्यालयासमोर मंगळवारी (दि. ३) दुपारी एक वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला.

राजेंद्र नारायण तुपे (वय ४५, रा. नाणेकरवाडी ) या बांधकाम व्यवसायिकाने याप्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. राजेंद्र यांनी चाकण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून चाकण पोलिसांनी सोमनाथ बिभीषण पाडवदे व सुमित बिभीषण पाडवदे (दोघेही रा. नाणेकरवाडी, ता. खेड) यांच्यावर मंगळवारी रात्री उशिरा विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.अधिक माहिती अशी की, तुपे यांनी पाडवदे यांच्या रूमचे फिलिंगचे काम केले होते. तरीही अजून लिकेज राहिले आहे. त्यामुळे चिडलेल्या पाडवदे भावंडांनी तुपे यांना शिवीगाळ व दमदाटी करून तुम्ही धंदा कसा करता, तुम्हांला मारून टाकतो, अशी धमकी दिली. तसेच दरवाज्याच्या प्रवेशाची काच फोडून प्रचंड नुकसान केले. फुटलेली काच सोमनाथ याने हातात घेऊन तुपे यांच्या डाव्या करंगळी जवळील बोटावर मारून त्यांना जखमी केले. चाकण पोलिसांनी याप्रकरणी सोमनाथ व सुमित यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. चाकण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

## चंपाषष्ठी उत्सवानिमित्त जेजुरी गडावर देवदीपावली

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्रीखंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्सव सुरु असून, उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी देव दिपावली अन्नकोट साजरी करण्यात आली. श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी,जयमल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठानच्या वतीने कुलदैवत खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाचे जेजुरी गडावर आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी जयमल्हार प्रतिष्ठानच्या वतीने रंगमहालातील श्री खंडोबा व म्हाळसा देवीच्या उत्सव मूर्ती श्रीराम मंदिराची प्रतिकृती उभारण्यात आली असून विविध प्रकारची फळे, दिवाळी फराळ व मिठाईची आरास करून देव दिपावली साजरी करण्यात आली. या बरोबरच त्रिकाळ पूजा, अभिषेक, आकर्षक रांगोळी, घडशी समाजाच्या वतीने चोवीस तास सनई चौघडा वादन, वाघ्या मुरुळींचा जागर, हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप सुरू आहे.



# बैलांना कत्तलीसाठी नेणाऱ्या तिघांवर गुन्हा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**चाकण :** जनावरे वाहतुकीचा कसलाच परवाना नसताना बेकायदेशीरपणे बैलांना कत्तलसाठी नेणाऱ्या तिघांवर चाकण पोलिसांनी रात्री साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान गुन्हा दाखल केला आहे. चाकण पोलीस ठाण्यातील हवालदार अतुल सखाराम कोंडवळे (वय ३७, रा. चाकण) यांनी या प्रकरणी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. कोंडवळे यांनी चाकण पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून चाकण पोलिसांनी कुशाबा यमा पारधी (वय - २८), संदीप कावजी वडेकर (वय - २५, दोघेही रा. पिपरगणे, ता. आंबेगाव) व शंकर उत्तम पाटील (वय - ४५, रा. दहिगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांच्यावर प्राण्यांचा छळ प्रतिबंध कायदा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की, कुशाबा, संदीप व शंकर हे तिघेजण संगणमताने शनिवारी एकत्रित आले होते. या तिघांनी मिळून एका पावणे दोन लाख रुपये किमतीच्या महेंद्र कंपनीच्या पिकप बोलेरो गाडीमध्ये २९ हजार रुपये किमतीचे दोन बैल दाटीवाटीने बांधले होते. यामध्ये बैलांना खाण्यासाठी चारा पाण्याची कुठल्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आली नव्हती. हे बैल कत्तलसाठी वाहतूक करीत असताना कुशाबा पारधी व संदीप वडेकर हे मिळून आले आहेत. चाकण पोलीस याप्रकरणी तपास करत आहेत.

## पानवडी यात्रेनिमित्त जादा गाड्या सोडा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पानवडी (ता. पुरंदर) येथील यात्रा ८ आणि ९ रोजी होत असून, त्या निमित्त बाहेरून येणाऱ्या मित्रमंडळी, पाहुणे, लेखी, युवक, युवती, जेष्ठ नागरिक, महिला यांना एसटीची सेवा मिळावी, यासाठी यात्रेनिमित्त जादा गाड्या सोडण्यात याव्यात, यासाठी सासवडचे आगार प्रमुख सागर गाडे यांना पानवडीच्या सरपंच अर्चना भिसे यांनी निवेदन दिले.



यात्रेनिमित्त कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने एसटी महामंडळ, विद्युत मंडळ यांना निवेदन देण्यात आले आहे.

### बारामती रेशीम कोष मार्केटमध्ये

# कोषास प्रति किलोस रू. ७२५/- दर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचे रेशीम कोष मार्केट मध्ये आज दि. ४ नोव्हेंबर रोजी रू. ७२५/- प्रति किलो असा उच्चांकी दर मिळाला. बारामती बाजार समितीचे रेशीम मार्केट हे ऑनलाईन मार्केट असल्याने महाराष्ट्र राज्यातील तसेच कर्नाटक, तामिळनाडु, पश्चिम बंगाल या राज्यातील खरेदीदार यामध्ये सहभागी होत आहेत. त्यामुळे कोषास चांगला दर मिळत आहे. रेशीम कोषास वाढत असलेल्या दरामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात तुती लागवडीकडे वळत आहे. बारामती मध्ये पारदर्शक व्यवहार, कोषाचे इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर अचुक वजन, ऑनलाईन पेमेंट, कुठलीही कडती नाही. यामुळे रेशीम कोष उत्पादक शेतक-यांनी आपला कोष बारामती रेशीम कोष मार्केट मध्येच विक्रीस आणावा असे आवाहन बारामती बाजार समितीचे सभापती सुनिल पवार व उपसभपाती निलेश लडकत यांनी केले आहे.



बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीने समिती मार्फत कोष खरेदीसाठी व्यापा-यांना तसेच रिलर्स यांना लायसेन्स दिले असल्याने महाराष्ट्र राज्यासह इतर राज्यातील लासन्सधारक खरेदीदार ऑनलाईन कोष खरेदी करीत आहेत. रेशीम मार्केट मध्ये आज एकुण ५४० किलो कोषाची आवक होऊन किमान रू. ५९० तर सरासरी रू. ६९०/- असा दर मिळाला आहे. काळुराम हरिभाऊ घाडगे आणि प्रमोद दादाभाऊ घाडगे रा. दावडी ता. खेड जि. पुणे या रेशीम कोष उत्पादक शेतक-यांच्या कोषास जादा दर मिळाला आहे. सन २०२२ पासुन रेशीम मार्केट सुरू झाले पासुन आत्तापर्यन्त ७ कोटी रूपयांची उलाढाल झाली असुन एकुण १६० टन कोष विक्री झाली आहे.

### अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

# चाकण येथे साडेतीन लाख रुपयांचा गुटखा जप्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चाकण :** चाकण औद्योगिक भागात गस्त घालत असताना कुरुळी ( ता. खेड, जि. पुणे) येथे एका इसमास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडे वेगवेगळ्या कंपनीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत तंबाखु व पानमसाला असा एकुण ३ लाख ४१ हजार ९१९ रुपये किंमतीचा माल मिळून आला.



प्रवीण कपूरचंद राठोड ( वय १९ वर्ष रा. सोनवणे वस्ती, कुरुळी ता. खेड जि.पुणे ) असे या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. वेगवेगळ्या कंपनीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत तंबाखु व पानमसाला असा ३ लाख ४१ हजार ९१९ रुपये किंमतीचा माल स्वत:चे फायद्याकरीता अवैधरित्या खरेदी करुन विक्री करीता जवळ बाळगताना मिळुन आला आहे. त्याच्या विरुध्द चाकण पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. सदरची कारवाई अमंली पदार्थ विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड, सहायक पोलीस फौजदार प्रदीप शेलार, पोलीस नाईक निखिल शेटे, पोलीस शिपाई गोविंद डोके व पोलीस शिपाई रणधीर माने आदींनी केली आहे.

# पाडेगाव येथे दत्तमंदिरचा वर्धापनदिननिमित्त कार्यक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** पुणे - सातारा जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या नीरा नदीच्या तिरावरील नीरा - पाडेगाव ( ता.खंडाळा) येथील माऊलींच्या पादुकांना नीरा स्नान ज्या ठिकाणी घातले जाते त्या प्रसिद्ध दत्तघाटावर सालाबादप्रमाणे श्रीदत्त मंदीर वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त सोमवारी (दि. ९) विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्रीदत्त सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रदीपकुमार काकडे यांनी दिली.

नीरा - पाडेगाव येथील श्री. दत्त मंदीराच्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त सोमवारी (दि. ९) सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत श्रींस रुद्राभिषेक व होम हवन श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजननाथ यांच्या हस्ते व संत सोपानकाका देवस्थान ट्रस्ट, सासवडचे अध्यक्ष अँड. त्रिगुण गोपाळराव गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तसेच दुपारी १२ वाजता श्रींची आरती व त्यानंतर दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

### रांजणगाव पोलीस ठाण्यात पाच जणांवर गुन्हा दाखल

# जमीन खरेदीमध्ये फसवणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** बाभूळसर खुर्द येथील करडे रोड येथे काही इसमांना ग्रुपमध्ये जमीन घ्यायची असल्याने त्यांनी जमीन विक्री करणाऱ्या काही इसमांना वेळोवेळी बावीस लाख रुपये दिले. मात्र, त्या इसमांनी सदर व्यक्तींना जमीन खरेदी करुन न देता दहा जणांची फसवणूक केल्याची घटना घडल्याचे उघडकीस आले. एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे सागर मगन पाचर्णे, अक्षय दत्तात्रय पाचर्णे, संतोष रघुनाथ गर्जे, उल्हास शिवाजी आडेकर व किसन लक्ष्मण नवले यांच्या विरुद्ध फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





याबाबत सविस्तर माहिती अशी की, बाभूळसर खुर्द ता. शिरुर येथील करडे रोड येथे दिपक म्हस्के, गोपाळ आडे, जोत्सना जाधव, निर्मलाबाई जाधव, प्रकाश राठोड, दिपक रायमळे, संतोष गायकवाड, लक्ष्मण चव्हाण, तुषार खिलारी, दिपक सपाटे यांना जमीन घ्यायची असल्याने त्यांनी जमीन मालक असलेल्या सागर पाचर्णे सह त्यांच्या साथीदारांना वेळोवेळी चेक, फोन पे तसेच रोख स्वरुपात तब्बल बावीस हजार रुपये दिले. मात्र, त्यानंतर वेळोवेळी जमीन खरेदीदारांनी जमीन मालकांना जमिनीचे खरेदीखत करुन देण्याची विनंती केली असताना, देखील त्यांनी सदर दहा लोकांना जमिनीचे खरेदीखत करुन न देता त्यांची फसवणूक केली असल्याची घटना घडली.

याबाबत दिपक भास्कर म्हस्के (वय ३२, रा. फंडवस्ती, रांजणगाव गणपती ता. शिरुर) यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. पोलिसांनी सागर मगन पाचर्णे (रा. करडे ता. शिरुर), अक्षय दत्तात्रय पाचर्णे (रा. चंदननगर पुणे), संतोष रघुनाथ गर्जे (रा. खराडी पुणे), उल्हास शिवाजी आडेकर (रा. वडगाव शेरी पुणे), किसन लक्ष्मण नवले (रा. कारेगाव ता. शिरुर) यांच्या विरुद्ध फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### तत्कालीन फडणवीस सरकारने संख्या वाढवण्याचा घेतला होता निर्णय

# जिल्हापरिषद निवडणुकीत नवीन गट-गण येणार?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विधानसभा निवडणुकीत महायुतीला निर्विवाद बहुमत मिळाल्याने गेल्या तीन वर्षांपासून खरडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध सर्वांना लागले आहेत. यामध्ये तत्कालीन फडणवीस सरकारने वाढीव लोकसंख्या विचारात घेऊन जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या गट- गटांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला होता, त्यानुसार नव्याने गट - गण रचनादेखील करण्यात आली होती.

परंतु राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यावर ही नव्याने करण्यात आलेली गट-गण रचना रद्द करण्यात आली होती. आता राज्यात पुन्हा एकदा फडणवीस सरकार सत्तेवर आल्याने जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका नवीन गट- गुणांनुसार होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



पुणे जिल्ह्यातील हवेली आणि मुळशी तालुक्यांतील २३ गावे म्हणजे तब्बल अडीच लाखांपेक्षा अधिक ग्रामीण लोकसंख्या महापालिका हद्दीत समाविष्ट झाली आहे. पुणे जिल्ह्याची ग्रामीण लोकसंख्या यामुळे नगर जिल्ह्यापेक्षा कमी झाल्याने पुणे जिल्हा परिषदेच्या गट- गणांची संख्यादेखील कमी झाली होती. नव्या गट रचनेत हवेली तालुक्यातील गट संख्या तब्बल ७ ने कमी झाली होती.

हवेली तालुक्यातील गटांची संख्या लोकसंख्या महापालिका हद्दीत गेल्याने कमी झाली होती.याच वेळी काही तालुक्यातील लोकसंख्या मोठ्याप्रमाणात वाढली असून, ही वाढीव लोकसंख्या लक्षात घेऊन जुन्नर, खेड, भोर, दौंड आणि इंदापूर तालुक्यांत गट व गणांच्या संख्येत वाढ करण्यात आली होती.

फडणवीस सरकारने त्या वेळी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका या रचनेनुसार घेण्याचा निर्णय घेतला तर आपल्या पूर्वीच्या निर्णयानुसार वाढीव लोकसंख्या विचार घेतली जाऊ शकते. यामुळेच काही तालुक्यांत जिल्हा परिषद गट गणांची संख्या कमी होऊ शकते व काही तालुक्यांत वाढ होऊ शकते.यापूर्वी तत्कालीन फडणवीस सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार पुणे जिल्हा परिषदेच्या गट गणांची संख्या जिल्ह्यातील गट-गणांचे फेरबदल केले होते.

गुरुवार, ६ डिसेंबर २०२४

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## हरपला माऊंट फुजीवरील बर्फ

जपानच्या भौगोलिक नकाशातच नव्हे, तर सांस्कृतिक जीवनातही माऊंट फुजीला स्थान आहे. या पर्वतशिखराकडे जपानी लोक अत्यंत प्रेमाने आणि आस्थेने पाहत असतात. या शिखरावर ऑक्टोबरच्या सुरुवातीपासूनच बर्फ दिसू लागतो. परंतु, नोव्हेंबर जवळ येऊनही जपानच्या या प्रसिद्ध शिखरावर अद्याप बर्फ दिसलेला नाही. देशाच्या हवामान संस्थेच्या म्हणण्यानुसार, १३० वर्षांपूर्वी पर्यावरणीय हालचालींची नोंद सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच अशी विलक्षण घटना घडली आहे. साधारणपणे ऑक्टोबरच्या सुरुवातीला माऊंट फुजीच्या शिखरावर बर्फ दिसण्यास सुरुवात होते. हे उन्हाळी गिर्यारोहणाच्या हंगामानंतर हिवाळा सुरू होण्याचे संकेत देते. परंतु, बुधवारपर्यंत माऊंट फुजीवर बर्फ दिसला नाही, असे कोफू स्थानिक हवामान कार्यालयातील हवामान अंदाज वर्तक युताका कात्सुता यांनी सांगितले.



१८९४ पासून कोफूच्या हवामान कार्यालयाने सामान्यत: फुजी पर्वतावर हंगामातील पहिल्या हिमवर्षावाची नोंद केली आहे. परंतु, यावर्षी वाढत्या तापमानामुळे शिखरावर बर्फ पडलेला नाही. कोफू कार्यालयातील हवामान अधिकारी शिनिची यानागी यांनी 'सीएनएन'ला सांगितले की, जपानमध्ये उन्हाळयापासून तापमानवाढ आणि पाऊस कायम आहे, त्यामुळे बर्फवृष्टी झाली नाही. हा उन्हाळा जपानमधील सर्वात उष्ण उन्हाळा असल्याचे सांगितले जात आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत सरासरी तापमान नेहमीच्या पातळीपेक्षा १.७६ अंश सेल्सिअस वाढले होते. सप्टेंबरमध्ये तापमान अपेक्षेपेक्षा जास्त होते; कारण उष्णकटिबंधीय प्रवाहात उत्तरेकडील बदलामुळे दक्षिणेकडून गरम हवा जपानच्या दिशेने आली.

उन्हाळ्याची तीव्र उष्णता ऑक्टोबरमध्ये चांगलीच वाढली, पहिल्या आठवड्यात ७४ हून अधिक शहरांमध्ये तापमान ३० डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त होते. क्लायमेट सेंट्रलने केलेल्या संशोधनाच्या मते, जपानमधील ही असामान्य ऑक्टोबर हीट हवामान बदलामुळे तिप्पट वाढली आहे. हवामान शास्त्रज्ञ युताका कात्सुता यांनी सांगितले की, शिखरांवर हिमकप तयार होण्यास उशीर होतोय, याला हवामानातील बदल अंशतः जबाबदार असू शकतो. या उन्हाळ्यात तापमान जास्त होते आणि हे उच्च तापमान सप्टेंबरपर्यंत चालू राहिले; ज्यामुळे थंड हवा कमी झाली, असे त्यांनी 'एएफपी'ला सांगितले. यावर्षीची तीव्र उष्णता नैसर्गिक अल निनो हवामान पद्धतीवर अवलंबून होती. जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे ही उष्णता आणखी वाढली आणि हेच हवामान संकटाचे प्राथमिक कारण असल्याचे वृत्त 'सीएनएन'ने दिले. माऊंट फुजीवर अद्याप बर्फ पडलेला नाही; ज्याचा परिणाम पर्यटन, स्थानिक अर्थव्यवस्था, अन्न आणि पाणीपुरवठा आणि अगदी स्थानिकांच्या आरोग्यावरदेखील दिसू शकतो आणि त्यांना ॲलर्जीसारखे लक्षणे दिसू शकतात.



## इथे दिवाळीच निषिद्ध!

कुठे कशा प्रथा असतील, हे काही सांगता येत नाही. दिवाळीचा सण देश-विदेशात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत असतो; पण हिमाचल प्रदेशातील हमीरपूर येथील एका गावात कधीच दिवाळीचा सण साजरा केला जात नाही. हमीरपूर जिल्ह्यातील सम्मू या गावात दिवाळी साजरी तर केली जात नाहीच शिवाय या दिवशी कोणतेही पक्वान्नही तयार केले जात नाही. येथील लोकांच्या मान्यतेनुसार या गावाला एक शाप मिळालेला आहे. त्यामुळे या गावात दिवाळी होत नाही. जर कोणी हा नियम मोडला तर गावावर संकट येते किंवा अकाली मृत्यू होतो, असा समज आहे.

यंदाही हमीपूर जिल्हा मुख्यालयाच्या जवळ २५ किमी दूरवर असलेल्या सम्मू गावात दिवाळी साजरी झाली नाही. येथे शेकडो वर्षांपासून दिवाळी साजरी करण्यास मनाई आहे. दिवाळीला दीप तर पेटवले जातात; परंतु कोणी चुकूनही फटाके फोडले किंवा मिठाई किंवा पंचपक्वान्न बनवले तर गावात नक्कीच संकट येते अशी गावकऱ्यांची मान्यता आहे. लोकांना या गावाला शापमुक्त करण्यासाठी प्रयत्न देखील झाले होते. अनेकदा हे प्रयत्न झाले होते; परंतु सारे प्रयत्न वाया गेले आहेत. लोकांवर या शापाची इतकी भीती आहे की दिवाळीला लोक घराबाहेर पडण्यास देखील योग्य समजत नाहीत. शेकडो वर्षांपासून या गावात दिवाळी साजरी केली नाही. कोणी दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न केला तरी गावात कोणाचा ना कोणाचा तरी मृत्यू होतो किंवा संकट येते असे ठाकूर विधीचंद या बुजुर्गाने सांगितले. हा सण सुरू झाला की वाईट वाटते. कारण देशात इतर ठिकाणी सर्वत्र दिवाळी साजरी होते. आजूबाजूच्या गावात दिवाळी सण होतो. आमच्या गावात हे होऊ शकत नाही, असे बीणा नावाच्या महिलेने सांगितले. गावाने या शापातून मुक्त होण्यासाठी अनेक होम हवन केले; परंतु यश आले नसल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत एक दंतकथा सांगितली जाते व ती आपल्या देशात सतीप्रथा सुरू असतानाची आहे. दिवाळीच्या दिवशी या गावातील एक महिला आपल्या पतीसोबत सती गेली होती. महिला दिवाळीसाठी माहेरी जायला निघाली होती. तिचा पती राजाच्या दरबारात सैनिक होता. परंतु, महिला गावापासून काही अंतरावर असतानाच तिला समजले की तिच्या पतीचा मृत्यू झाला आहे. तेव्हा ती महिला गर्भवती होती. महिलेला हा धक्का सहन झाला नाही तिने पतीसोबत सती जाण्याचा निर्णय घेतला. जाताना तिने साऱ्या गावाला शाप दिला की या गावातील लोक कधीच दिवाळीचा सण साजरा करू शकणार नाहीत. त्यानंतर या गावात कोणी दिवाळी साजरी केलेली नाही. लोक केवळ सतीच्या मूर्तीची पूजा करतात!

## मानवाच्या स्थलांतराचा इतिहास बदलणार?

गिस्ट्रेलिया खंडात ६५ हजार वर्षांपूर्वी मानवाचे अस्तित्व असल्याचे पुरावे पुरातत्त्व शास्त्रज्ञांना मिळालेले आहेत. या शोधाने आधुनिक मानवाने आफ्रिकेतून स्थलांतराला सुरुवात केल्याच्या ज्ञात इतिहासाला बदलले आहे. ऑस्ट्रेलिया खंडाच्या उत्तरेकडील प्राचीन काकाडूतील जाबिलुका येथील खाणींच्या पट्ट्यामध्ये पुरातत्त्व उत्खननात ऑस्ट्रेलियातील आदिवासी जमातीचे वास्तव्य येथे किमान ६५ हजार वर्षांपासून असल्याचे पुरातत्त्व शास्त्रज्ञांना आढळून आले. त्याप्रमाणे येथे राहणारे मानवाचे पूर्वज हे अवजारे बनविण्यातदेखील कुशल असल्याचे आढळले. याआधी समजल्या जाणाऱ्या काळाच्या १८ हजार वर्षांपूर्वीपासून मानवाचे ऑस्टेलियात वास्तव्य होते, असे आढळून आले.

या शोधामुळे पुरातत्त्व क्षेत्रामध्ये कुतूहल निर्माण झाले. या संशोधनाची समीक्षा प्रसिद्ध पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी केली असून, ती 'नेचर' या प्रतिष्ठित विज्ञान नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली.

ऑस्ट्रेलियात वास्तव्य करणारा मानव हा त्या काळातील अत्याधुनिक अवजारे बनवत असल्याचे संशोधनादरम्यान आढळलेल्या अवजारांवरून सिद्ध होते. अशा प्रकारच्या अवजारांची निर्मिती त्यानंतर २० हजार वर्षांनी झाल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले. संशोधनात आम्हाला चांगल्या प्रकारे जतन झालेल्या कुऱ्हाडी आढळल्या, असे पुरातत्त्व संशोधक व क्विन्सलँड विद्यापीठाचे प्राध्यापक ख्रिस क्लार्कसन यांनी सांगितले. या शोधामुळे आधुनिक मानव हा आफ्रिका खंडातूनच स्थलांतरित झाला होता, या संकल्पनेला तडा गेला आहे.



## स्टायरोफोमइतकी घनता असलेला बाह्यग्रह!

अंथ्वीपासून ३२० प्रकाशवर्षे अंतरावर असलेल्या ताऱ्याभोवती फिरणाऱ्या मोठ्या ग्रहाचा शोध वैज्ञानिकांनी लावला असून, त्याची घनता स्टायरोफोमइतकी आहे. हा ग्रह फुगलेला असून, त्याचा फायदा जीवसृष्टी असणाऱ्या ग्रहांचा अंदाज घेण्यासाठी करता येणार आहे, त्यासाठी तेथील वातावरणाच्या चाचण्या घ्याव्या लागतील. हा ग्रह फुगलेला असून, त्याचे वस्तुमान गुरूच्या एक पंचमांश आहे; पण तो ४० टक्के मोठा आहे. त्याचे वातावरण विस्तृत आहे, असे अमेरिकेतील लेहीग विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक जोशुआ पेप्पर यांनी सांगितले.

स्टायरोफोम हे फुगवलेले पॉलिस्टायरिन असते व ते अन्नाचे कंटेनर तयार करण्यासाठी वापरले जाते. या ग्रहाचा मातृतारा चमकदार असून, त्यामुळे या ग्रहाच्या वातावरणाचे मापन सहज शक्य आहे. इतर ग्रहांच्या वातावरणाच्या मापनासाठी हा ग्रह म्हणजे एक सराव प्रयोगशाळा ठरणार आहे. या



ग्रहाचे नाव केईएलटी ११ बी असे असून, तो ताऱ्याभोवतीच अगदी जवळच्या कक्षेतून फिरत आहे. या कक्षेत फिरण्यास त्याला पाच दिवस लागतात. केईएलटी ११ हा तारा अणुइंधन वापरत असून, त्याचे रूपांतर लाल मोठ्या ग्रहात होत आहे. त्यानंतर तो ग्रह ताऱ्याने वेढला जाईल व पुढील शेकडो दशलक्ष वर्षांत तो तग धरू शकणार नाही.

## ब्रिटिशही पूर्वी होते काळे

इंग्रजी राजवटीच्या काळात आपल्या देशात इंग्रजांना 'गोरा साहेब' असे म्हटले जात असे. या गोरेपणाची घमेंड अनेक पाश्चात्त्यांना आजही असते. कृष्णवर्णीयांना अशाच मनोवृत्तीच्या लोकांनी जी वागणूक दिली ती इतिहासात नमूद आहे. मात्र हेच 'गोरे' म्हणवून घेणारे लोक एकेकाळी काळेच होते हे तुम्हाला माहिती आहे का? हो, हे खरे आहे. इंग्रज हे मुळात काळे होते असे संशोधन झालेले असून, लंडनमध्येच झालेल्या एका अभ्यासातून ही बाब समोर आली आहे.

१० हजार वर्षांपूर्वीच्या सापळ्यातील डीएनएचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांकडून ही बाब समोर आलेली आहे. त्यामुळे ब्रिटनमधील मूळ व्यक्ती हा वर्णाने काळा असल्याच्या गोष्टीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. याशिवाय या व्यक्तीच्या डोळ्यांचा रंग निळा असल्याचे समोर आले आहे. यासाठी सापळ्यातील डीएनएचा अभ्यासकांनी अभ्यास केल्यानंतर ही बाब लक्षात आली आहे.

या संशोधनासाठी ब्रिटन नॅचरल हिस्टरी म्युझियम आणि लंडनमधील युनिव्हर्सिटी कॉलेजच्या संशोधकांनी विशेष अभ्यास करत ही बाब समोर आणली. त्यांनी सापळ्यातील कवटीला २ मिलिमीटरचा छेद देऊन त्यातील हाडांचे नमुने तपासणीसाठी घेतले. या नमुन्यांचा अभ्यास केल्यानंतर १० हजार वर्षांपूर्वी 'ब्रिटिश' काळे असल्याची बाब समोर आली. ब्रिटिश कायम गोरेच असतात, असा आपल्या सगळ्यांचा समज असतो. मात्र, आताच्या संशोधनाने हा समज मोडीत निघाला आहे. त्यामुळे हे संशोधन ही अतिशय आश्चर्याची बाब असल्याचे या संशोधकांचेही म्हणणे आहे.




## मागणी राणी नेफरतितीच्या पुतळ्याची

इजिप्तच्या तीन-चार हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृतीच्या खुणा आजही पिरॅमिड, मकबरे व प्राचीन कलाकृतींच्या स्वरूपात पाहायला मिळतात. त्यापैकीच एक कलाकृती म्हणजे ३,३७० वर्षांपूर्वीच्या राणी नेफरतितीचा पुतळा. या पुतळ्याचा शोध लागल्यापासून तो जर्मनीतच आहे. एका इजिप्शियन पुरातत्त्वज्ञाने बर्लिनमध्ये असलेला हा राणी नेफरतितीचा अर्धपुतळा परत करण्याची मागणी केली आहे; तर जर्मनीने तसे करण्यास नकार दिला आहे.

नेफरतिती प्राचीन इजिप्तच्या इतिहासातील एक अत्यंत प्रसिद्ध आणि प्रभावशाली राणी होती. ती फेरो (राजा) अखेनातेनची पत्नी होती. फेरो अखेनातेन हा इजिप्तच्या अठराव्या राजवंशातील एक महत्त्वाचा शासक होता. अखेनातेनच्या कारकिर्दीत इजिप्तमध्ये धार्मिक क्रांती झाली. अतेनच्या- सूर्यपूजनाला महत्त्व याच कालखंडात प्राप्त झाले तर नेफरतितीने या नवीन धार्मिक परंपरेमध्ये आपल्या पतीला पाठिंबा दिला. नेफरतितीची प्रतिमा इजिप्तमधील अनेक कलाकृतींमध्ये आढळते. तिचा प्रसिद्ध रंगीत चुनखडीचा अर्धपुतळा १९१२ साली जर्मन पुरातत्त्वज्ञांनी अमार्ना शहरातून शोधून काढला. आज तो प्रसिद्ध पुतळा बर्लिनच्या न्यूस म्युझियममध्ये आहे. नेफरतिती ही केवळ तिच्या सौंदर्यासाठी प्रसिद्ध नव्हती, तर ती एक बुद्धिमान आणि शक्तिशाली स्त्री होती. तिच्या अनेक शिल्पांवरून ती पतीच्या समकक्ष मानली जात असल्याचे संकेत मिळतात. तिचा प्रभाव तिच्या जीवनकाळात आणि त्यानंतरही इजिप्तच्या इतिहासात कायम राहिला आहे. तिचा अर्धपुतळा आजही जगभरातील अनेकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच जर्मनीकडून हा पुतळा परत मिळावा, अशी मागणी आता मूळ धरू लागली आहे. नेफरतितीच्या अर्धपुतळ्याची किंमत अंदाजे ४३३ दशलक्ष डॉलर्स एवढी आहे. हा पुतळा इजिप्शियन पुरातन वस्तूंच्या मुकुटातील एक रत्न मानला जातो. परंतु, राणी नेफरतितीचा ३,३७० वर्षांपूर्वीचा अर्धपुतळा १९१३ पासून बर्लिनमध्ये आहे. आता तो परत देण्याबाबत दबाव वाढतो आहे. इजिप्तचे माजी पुरातत्त्व विभाग मंत्री झही हवास यांनी होस्नी मुबारक यांच्या २०११ मधील राजीनाम्याच्या निदर्शनांपूर्वी नेफरतितीचा पुतळा परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. जर्मनीने राणी नेफरतितीचा प्रसिद्ध अर्धपुतळा परत करावा यासाठी हवास यांनी यावर्षीही सप्टेंबरमध्ये याचिकेच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत.






## पृथ्वीशी साधर्म्य असणारा बाह्यग्रह

एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी विकसित होण्यासाठी काही गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. त्यामध्ये योग्य तापमानासाठी ग्रहाचे त्याच्या ताऱ्यापासूनचे अंतर, कठीण-खडकाळ पृष्ठभाग आणि पाण्याचे अस्तित्व याचा यामध्ये समावेश होतो. आतापर्यंत खगोलशास्त्रज्ञांनी आपल्या सौरमालिकेबाहेरील हजारो ग्रहांचा शोध लावलेला आहे. यापैकी काही बाह्यग्रह पृथ्वीसारख्या कठीण पृष्ठभागाचे आहेत. त्यामध्ये पृथ्वीपासून १११ प्रकाशवर्ष अंतरावर असलेल्या 'के १८ बी' या ग्रहाचा समावेश होतो. कॅनडातील टोरांटो विद्यापीठाच्या संशोधकांनी युरोपियन सदर्न ऑब्झर्व्हेटरीच्या साहाय्याने या बाह्यग्रहाचा शोध लावला. तो 'के-१८' या लाल बटू ताऱ्याभोवती फिरत आहे. सिंह तारकापुंजात तो पृथ्वीपासून १११ प्रकाशवर्ष अंतरावर आहे. टोरांटो विद्यापीठाचे संशोधक रायन क्लॉटियर यांनी सांगितले की, के २-१८ बी हा ग्रह विलक्षण आहे आणि त्याचा शोध उत्कंठा वाढवणारा आहे. २०१५ मध्ये या ग्रहाचा शोध लागला होता व एका ताऱ्यापासून वसाहतयोग्य अंतरावर तो फिरत आहे, हे लक्षात आले होते. योग्य तापमान असल्याने तिथे पाणीही असण्याची शक्यता आहे. अद्याप काही घटकांच्या आधारे त्याची पृथ्वीसदृश ग्रह म्हणून तपासणी होणे बाकी आहे, असे 'ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स' या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हटले आहे. क्लॉटियर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चिलीतील युरोपियन स्पेस ऑब्झर्वेटरीच्या साहाय्याने हे संशोधन केले.

## मानवी जनुकीय घड्यांच अनोखा नकाशा

माणसाचे अवघे व्यक्तिमत्त्व तसेच आरोग्य व अगदी आयुर्मानापर्यंतच्या सर्व गोष्टींची कुंडली त्याच्या जनुक व डीएनएमध्ये लपलेली असते. अशा मानवी जनुकीय घड्यांचा चार मितींचा नकाशा तयार करण्यात आला असून, त्यात भारतीय वंशाच्या वैज्ञानिकाचा समावेश आहे. स्टॅनफर्ड व हार्वर्ड विद्यापीठातील संशोधकांनी हे यश मिळवले आहे. त्यामुळे जनुकीय आजारांवर उपचारात मदत होणार आहे.


गेली काही दशके संशोधकांना असे वाटत होते की, मानवी पेशी या काही विशिष्ट पद्धतींनी एकमेकांशी संपर्कात असतात. ते एकमेकांच्या लगेच सान्निध्यात येतात व गुणसूत्राभोवती कडे करतात. डीएनएच्या घटकांची फेररचना करता येते. त्यातून पेशी कुठली जनुके क्रियाशील करायची हे ठरवत असतात. २०१४ मध्ये वैज्ञानिकांनी असे सांगितले होते की, ही वेटोळी शोधता येतात. यातील पहिले नकाशे हे स्थिर स्वरूपाचे होते व त्यात वेटोळ्यातील बदल टिपता आला नव्हता. पेशी केंद्रकाच्या गर्दीच्या जागेत डीएनए एकमेकांना कसे ओळखतात व पेशींचा प्रतिसाद कसा नियंत्रित होतो हे आता समजत आहे. यापूर्वी जे नकाशे होते त्यात घडी असलेल्या जिनोमचा विशिष्ट अवस्थेत वेध घेतला जात होता; पण स्थिर चित्रातून बदल कळत नव्हते. त्यामुळे प्रक्रिया नेमक्या कशा घडतात हे कळत नव्हते, असे स्टॅनफर्डचे विद्यार्थी सुहास राव यांनी सांगितले. जनुकांच्या घड्यांचा अभ्यास करून त्यांच्यातील घडणे व नष्ट होणे या दोन्ही क्रिया एखाद्या चित्रपटासारख्या पकडता येतात, असे राव यांनी सेल या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हटले आहे. जनुकांच्या घड्यांची प्रक्रिया शोधण्यासाठी चकतीच्या आकाराच्या कोहेजिन या प्रथिनाचा वापर करण्यात आला. ते या वेटोळ्यांच्या सीमेवर होते. यापूर्वी या वैज्ञानिकांनी डीएनए वेटोळी कोहेसिनमुळे पेशीत तयार होतात व त्या प्रक्रियेला एक्सट्रूशन म्हणतात, असे स्पष्ट केले होते. पाठीवरच्या बॅगेच्या पट्टट्याची लांबी कमी-जास्त करता येते, तसा एक्सट्रूशन प्रक्रियेचा उपयोग असतो. त्यामुळे डीएनएची वेटोळी तयार होतात व कोहेसिन वेटोळी जे ठरवतील तेच काम ते डीएनए करतात. कोहेसिन नसेल तर वेटोळी नष्ट होतात, असे राव यांचे म्हणणे आहे. कोहेसिन डीएनएमध्ये ज्या वेगाने फिरते त्या वेगाने कुठलेही प्रथिन फिरत नाही.



## नितीन गडकरी यांचे संसदेत वक्तव्य

# काम केले नाही तर बुलडोझर चालवू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** कंत्राटदाराने नीट काम केले नाही तर त्याला बुलडोझरखाली टाकू, असे मी जाहीर सभेत सांगितले आहे. आम्ही अजिबात तडजोड करणार नाही. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या बांधकामात त्रुटी आढळल्यास चार कंत्राटदारांना जबाबदार धरण्यात आले असून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, असे नितीन गडकरी यांनी सभागृहाला सांगितले. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले की, आयआयटी खरगपूर आणि आयआयटी गांधीनगरच्या तज्ज्ञांनी एक्स्प्रेस वेची पाहणी केली आणि त्याच्या बांधकामात त्रुटी आढळल्या.

रस्ते बांधणीचा वेग आणि गुणवत्तेशी तडजोड न करण्याची ख्याती असलेल्या नितीन गडकरी यांनी संसदेत मोठं वक्तव्य केलं आहे. जे कंत्राटदार योग्य काम करणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे मी यापूर्वीच म्हटले आहे, असे त्यांनी गुरुवारी लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आमच्या विभागाने ५० लाख कोटी रुपयांची कामे केली आहेत. आम्ही पारदर्शक, कालबद्ध, परिणामाभिमुख आहोत, असेही ते म्हणाले.

आम्ही चार कंत्राटदारांना नोटिसा बजावल्या असून, त्यांना काळ्या यादीत टाकू. कडक कारवाई केली जाईल. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर ही कारवाई करण्यात येणार आहे. दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्ग हा देशातील सर्वात लांब रस्ता असून तो कमीत कमी वेळेत तयार करण्यात आला आहे. रस्ते बांधणीत दिरंगाई झाल्यास त्यास जबाबदार अधिकाऱ्यांची नावे जाहीर केली जातील, असा इशाराही नितीन गडकरी यांनी अनेकदा अधिकाऱ्यांना दिला. चांगल्या कामाचे बक्षीस दिले तर चुकीच्या कामासाठी त्यांचा पर्दाफाश करणेही गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

## फेंगलमुळे राज्यात पावसाच्या सरी कोसळणार



**मुंबई :** सध्या हिवाळी मोसमाला सुरुवात झाली आहे. मात्र काही दिवसांपूर्वी बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या फेंगल चक्रीवादळामुळे राज्यात अनेक ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या, अशातच अजूनही फेंगल चक्रीवादळाचा जोर कायम असल्याचे दिसून येत आहे. फेंगल चक्रीवादळाचा महाराष्ट्रालाही तडाखा दिला असून येत्या २४ तासांत कमी दाबाचा पट्टा कमकूवत होणार आहे. त्यामुळे काही जिल्ह्यात पावसाच्या सरी कोसळणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काल राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्रासह मराठवाड्यातही काही भागात हलक्या ते मध्यम सरींचा पाऊस होता. आता आज पावसाचा जोर काहीसा वाढणार असून कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड जिल्ह्यातही हलक्या ते मध्यम सरींची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार असून पुणे व सातारा घाट परिसरात मुसळधार पाऊस येणार आहे. तसेच मध्य महाराष्ट्रात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. नगर जिल्ह्यात हलक्या सरींचा पाऊस होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात धाराशिव आणि लातूर या दोन जिल्ह्यांना जोरदार पावसाचा अलर्ट देण्यात आला असून बीड, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम पावसाची अपेक्षा आहे.

**» Selected**

## बाबरने जे केले तेच बांगलादेशात होते आहे

**लखनौ :** मुघल शासक बाबरच्या सैन्याने अयोध्या आणि संभलमध्ये जे केले त्याचा डीएनए आज बांगलादेशात घडत आहे, तोच डीएनए आहे, असा घणाघात उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुरुवारी केला. रामायण मेळाव्याचे उद्घाटन केल्यानंतर बोलताना योगी आदित्यनाथ म्हणाले की, प्रभू श्रीरामाने या संपूर्ण समाजाला एकसंध केले. आपण ऐक्याला महत्त्व दिले असते आणि देशाच्या शत्रूंची रणनीती यशस्वी होऊ दिली नसती, तर हा देश कधीच गुलाम झाला नसता. आमची देवस्थाने कधीच अपवित्र झाली नसती.
मूठभर आक्रमकांनी आपल्यावर हल्ला केला नसता आणि भारताच्या शूर सैनिकांनी त्यांना चिरडले असते, असे प्रतिपादन त्यांनी केले. शेजारी देशांमध्ये आपले शत्रू कशा प्रकारचे कृत्य करत आहेत हे तुम्ही पाहा. बाबराने ५०० वर्षांपूर्वी अयोध्या आणि संभलमध्ये जे केले, तेच आज बांगलादेशातही घडत आहे, असेही ते म्हणाले.

## शंभू सीमेवर मोठा बंदोबस्त

**नवी दिल्ली :** शंभू सीमेवर मोठ्या संख्येने शेतकरी आंदोलनाला बसले असून, शुक्रवारी, दुपारी १२ वाजता ते दिल्लीकडे पदयात्रेला सुरुवात करतील. दोन दिवसांपूर्वी अंबाला पोलिसांनी शंभू सीमेवर कलम १४४ लागू केले आहे. गुरुवारी शेतकऱ्यांच्या आंदोलनादरम्यान हरियाणा पोलिसांनी जेसीबीच्या साहाय्याने सिमेंटचे मोठे ब्लॉक टाकून रस्ता बंद केला आहे. नोटिसाही चिकटवण्यात आल्या आहेत. दिल्लीत जाऊन आंदोलन करण्याची परवानगी मिळणार नाही, असे सरकारने शेतकऱ्यांना स्पष्टपणे सांगितले आहे. अशा परिस्थितीत त्यांना हरयाणात प्रवेश दिला जाणार नाही. हरियाणा पोलीस आणि निमलष्करी दलाने शंभू सीमेवर दिल्ली-जालंधर राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला असून, या भागात सुरक्षा वाढवण्यात आली आहे.

## या ६ जणांना विधान परिषदेत जाण्यास मज्जाव

# विधानसभेवर निवडून गेल्याने सदस्यत्व रद्द


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्रातील नव्या सरकारचा आज शपथविधी पार पडणार आहे. देवेंद्र फडणवीस हे मुंबईतील आझाद मैदानावर मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. तर दुसरीकडे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह सहा आमदारांना विधान परिषदेत जाण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

हे सहा जण विधान परिषद सदस्य विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. त्यामुळे २३ नोव्हेंबरपासून या सर्व आमदारांचे विधान परिषदेचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयाने हा निर्णय घेतला आहे. एका व्यक्तीस दोन्ही सभागृहाचे सदस्य होता येत नसल्याने त्यांचे विधान परिषदेचे सदस्यत्व रद्द केले आहे.

### विधानसभा निवडणुकीत मिळवला विजय

- चंद्रशेखर बावनकुळे कामठी विधानसभेतून निवडणूक जिंकले.
- गोपीचंद पडळकरांनी जत विधानसभा मतदारसंघातून बाजी मारली.
- प्रवीण दटके यांनी नागपूर मध्य विधानसभेतून निवडणूक जिंकली.
- शिंदे गटाचे आमश्या पाडवी अक्कलकुवा मतदारसंघातून विजयी झाले.
- राष्ट्रवादीचे राजेश विटेकर यांनी पाथरी विधानसभा मतदारसंघातून बाजी मारली.
- रमेश कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून विजय मिळवला आहे.



चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह नागपूरचे प्रवीण दटके, आमश्या पाडवी, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधान परिषदेचे सदस्य होते. हे सर्व नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. ते आता विधानसभेत दाखल होणार आहेत.

## अमित शहा छत्तीसगडच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा १४ डिसेंबरपासून तीन दिवस छत्तीसगडच्या दौऱ्यावर



जाणार असून, या दरम्यान ते राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतील आणि आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवादी आणि स्थानिकांशी संवाद साधतील.

छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साई यांनी बुधवारी शहा यांची भेट घेऊन राज्यातील बस्तर आणि कोंडागाव जिल्हे अतिरेक्यांपासून पूर्णपणे मुक्त झाले असून त्यांना इतर भागातून समूळ नष्ट करण्याची मोहीम सुरू असल्याचे सांगितले. केंद्रीय गृहमंत्री रायपूरमध्ये सुरक्षा आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# प्रियांका गांधींनी घेतली अमित शाह यांची भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा यांच्यासह केरळमधील अनेक लोकसभा खासदारांनी बुधवारी गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन वायनाडमधील भूस्खलनग्रस्तांना मदत करण्याचे आवाहन केले. संसद भवन परिसरातील शहा यांच्या कार्यालयात ही बैठक झाली. या बैठकीत केरळमधील काँग्रेस, आययूएमएल आणि आरएसपीचे खासदार उपस्थित होते.

शहा यांची भेट घेतल्यानंतर वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी यांनी पत्रकारांना सांगितले की, आम्ही गृहमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना वायनाडमधील परिस्थितीची माहिती दिली आहे. भूस्खलनामुळे तेथील लोकांच्या जीवनावर खूप खोल परिणाम झाला आहे. लोकांची कुटुंबे आणि घरे उध्वस्त झाली आहेत, त्यांच्याकडे कोणतीही आधार यंत्रणा शिल्लक राहिलेली नाही.

अशा परिस्थितीत केंद्र सरकारने काहीच केले नाही, तर जनतेची काय अपेक्षा असेल? वायनाडच्या जनतेला राजकारणाच्या पलीकडे जाऊन मदत करावी, असे आवाहन आम्ही गृहमंत्र्यांना केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथील पीडितांची भेट घेतली तेव्हा लोकांना मदतीची आशा होती, पण अद्याप कोणतीही मदत मिळालेली नाही.

वायनाडमध्ये यावर्षी जुलै मध्ये भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, ज्यात अनेकांचा मृत्यू झाला होता. वायनाडच्या जनतेला राजकारणाच्या पलीकडे जाऊन मदत करावी, अशी विनंती मी शहा यांना केली आहे. पुरामुळे सर्वांची घरे, शाळा वाहून गेल्या असून या पार्श्वभूमीवर माणुसकीच्या आधारावर लोकांना मदत करण्याची विनंती मी गृहमंत्र्यांना केली आहे. अशा वेळी वायनाडच्या पीडितांना राजकारणाच्या पलीकडे जाऊन मदत करायला हवी. आम्ही पंतप्रधान तसेच गृहमंत्र्यांना निवेदन दिले असून सरकारने पीडितांना मदत करावी, अशी विनंती केली आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या मोफत पासचा निर्णय लांबणीवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एसटी कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत पासची सेवा लागू करणे तसेच सर्व गाड्यांमध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांऐवजी १ वर्षाचा मोफत पास उपलब्ध करून देण्याचा निर्णय आता लांबणीवर गेला आहे. या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाची बैठक बुधवारी होणार होती, मात्र नव्या सरकार स्थापनेच्या व्यस्त वेळापत्रकामुळे एसटीच्या संचालक मंडळाची ही बैठक रद्द झाल्याची माहिती एसटी कर्मचारी संघटनेकडून प्राप्त झाली आहे.

एसटी महामंडळामध्ये कार्यरत कर्मचारी त्यांच्या कुटुंबीयांना राज्यात आणि राज्याबाहेर धावणाऱ्या एसटी बसमधून मोफत प्रवास करण्यासाठी सध्या दोन महिन्यांचा पास मिळतो, तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांचा पास मिळतो. मात्र या पासची मुदत वाढवावी याबाबत एसटी संघटना गेल्या दोन वर्षांपासून शासन दरबारी प्रयत्न करत आहेत. त्यानुसार ४ एप्रिल २०२४ रोजी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये संघटनेच्या प्रलंबित मागण्यांवर चर्चा करून सकारात्मक निर्णय घेण्यात येईल व याचा प्रस्ताव संचालक मंडळापुढे सादर करण्यात येईल, असेही मान्य केलेले आहे.

## दादांना शुभेच्छा...

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**मुंबई :** नागालँड येथील राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने येथील देवगिरी बंगल्यावर अजित पवार यांची भेट घेत त्यांचे अभिनंदन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल उपस्थित होते.

## ठाण्यात पाचवीतल्या चिमुरडीसमोर अश्लिल कृत्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे :** बदलापूरमध्ये विद्यार्थिनी सोबत केलेल्या लैंगिक छळाचं प्रकरण उजेडात आल्यानंतर शाळेतील शिक्षकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह लागलं. त्यानंतर आता मुंब्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका शाळेत घडलेल्या घटनेनं मोठी खळबळ उडाली आहे. एका माथेफिरूनं वर्गात एकटी बसेल्या ५ वीच्या वर्गातील चिमुकलीसमोर अश्लील कृत्य केलं. मात्र पीडितेनं ही बाब पालकांना आणि वर्गातील प्राचार्य महिलेला सांगितली. मात्र प्राचार्य महिलेनं ही बाब लपवून ठेवली. शाळेची बदनामी होईल, त्यामुळे कोणाला काही सांगू नको, असा दम पीडितेला प्राचार्यानं दिला. मात्र पीडितेनं ही बाब पालकांना सांगितल्यानं पालकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यामुळे या प्रकरणी प्रकरण लपवून ठेवणाऱ्या प्राचार्य महिलेवर गुन्हा दाखल करुन पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

प्राचार्य महिलेनं पीडितेला धमकावून लपवलं पोक्सोचं प्रकरण : पालकांनी एका पाचव्या वर्गात शिकणाऱ्या चिमुकलीला वर्गात सोडल्यानंतर एका अज्ञात माथेफिरुनं चिमुकलीसमोर जाऊन अश्लील कृत्य केलं. ही घटना मंगळवारी सकाळी ७ ते ७.१५ वाजण्याच्या सुमारास घडली.

# संसदेच्या आवारात अदानी मुद्द्यावर निदर्शने

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा गुरुवार हा ९ वा दिवस असून, काँग्रेस खासदारांची संसद भवन संकुलात अदानी मुद्द्यावर निदर्शने केली. यावेळी संसद सभागृहात अदानी मुद्दावर चर्चा व्हावी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मुद्द्यावर बोलावे तसेच अदानी प्रकरणावर संसदीय समिती स्थापन करावी, अशा मागणी विरोधी पक्षातील नेत्यांनी केली आहे.

अदानी समुहाचे अध्यक्ष उद्योगपती गौतम अदानी आणि कंपनीच्या इतर अधिकाऱ्यांवर अमेरिकेने लाचखोरी आणि फसवणुकीचा आरोप केला आहे. या आरोपाची संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणीदेखील विरोधी पक्षांनी यावेळी केली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी यांच्यासह विरोधी खासदारांनी देखील निदर्शनात सहभाग घेतला.

## इस्रायलमध्ये मशिदींमधील स्पीकरवर बंदी

**तेल अवीव :** इस्रायल येथील मशिदींमधील स्पीकरवरून होणाऱ्या अजानवर बंदी घातली आहे. संरक्षणमंत्री इटामार बेन गवीर यांनी पोलिसांना मशिदींमध्ये लावलेले स्पीकर जप्त करण्याचे आणि आवाज केल्यास दंड आकारण्याचे निर्देश दिले आहेत. पूर्व जेरुसलेम आणि इतर अनेक भागांतील मशिदींमधून मोठा आवाज येत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत.

# पुष्पा 2 प्रदर्शित : चेंगराचेंगरीत महिलेचा मृत्यू


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** सुपरस्टार अभिनेता अल्लू अर्जुन याचा बहुचर्चित पुष्पा २ हा चित्रपट गुरुवारी प्रदर्शित झाला. या चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अभिनेता अल्लू अर्जुन आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना हे चित्रपटगृहात उपस्थित होते. मात्र यावेळी अभिनेता अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदाना यांना पाहण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केल्यानं प्रचंड चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत एका महिलेचा मृत्यू झाला असून त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला.

बुधवारी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास हैदराबादच्या आरटीसी क्रॉसरोड इथल्या संध्या थिएटरमध्ये पुष्पा-२ शोसाठी चित्रपटाचा अभिनेता अल्लू अर्जुन आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना यांनी हजेरी लावली. मात्र त्यांची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली. या गर्दीमुळे या परिसरात चेंगराचेंगरी झाली. मात्र चेंगराचेंगरी रोखण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केला. या चेंगराचेंगरीत रेवती (३५) आणि त्यांचा मुलगा श्रीतेजा (९) खाली पडले. हे दोघंही जमावाच्या पायाखाली चिरडल्यानं गंभीर जखमी झाले. या दोघांना बेशुद्ध अवस्थेत पोलिसांनी बाजुला घेऊन सीपीआर दिला.

# कराडमध्ये अमूलाग्र परिवर्तनाची नांदी दिसेल : आ. अतुल भोसले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून दक्षिण कराडने केवळ प्रतिष्ठेचे राजकारण करणारे नेते दिले. त्यामुळे नाव मोठे परंतु विकासाबाबत लक्षण खोटे असे चित्र दिसले. आमदार नसतानाही देवेंद्र फडणवीस यांनी अनेक कामांकरिता मला निधी दिला आता प्रत्यक्ष विधानसभेत संधी देऊन देवाभाऊंच्या नेतृत्वाखाली कराडचे संपूर्ण अमूलाग्र परिवर्तन करून एक विकासात्मक तालुका म्हणून या शहराला पुढे नेऊ असा विश्वास आमदार अतुल भोसले यांनी व्यक्त केला.

आज मुंबई येथे देवेंद्र फडणवीस यांच्या ऐतिहासिक शपथविधी सोहळ्यात आमदार भोसले उपस्थित होते त्यावेळी त्यांनी राष्ट्र संचारशी संवाद साधला.

भोसले यांनी सांगितले की, कराड हा यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांना मानणारा तालुका आहे त्यामुळे सातत्याने विकासाचे आणि गरीब जनतेच्या कल्याणाचे राजकारण येथे चालले. परंतु यशवंतराव चव्हाण ही आपलीच वारसा हक्काने मिळालेली इस्टेट आहे, अशा विचाराने काँग्रेसने काही प्रोपागंडा केला त्यामुळे प्रदीर्घकाळ येथे काँग्रेसचे शासन राहिले त्यामुळे काँग्रेसच्या कारकिर्दी मधील अन्याय देखील वाढत गेले. राजकीय उदासीनता आणि एक प्रकारचे हुकूमशाही चालविण्याचे काम तेथे झाले परंतु सूज्ञ जनतेने फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपला कौल दिला मोदीजींच्या विचाराला प्राधान्य दिले आणि खऱ्या विकासाचा मार्ग स्वीकारला आहे. यापूर्वी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीवर काम केल्यामुळे पांडुरंगाचा आशीर्वाद माझ्याकडे होताच परंतु धार्मिक आणि प्रशासकीय कार्याची समज मला त्या माध्यमातून मिळाली. त्यामुळे माझ्या या यशामध्ये पंढरपूरचा मोठा वाटा आहे आणि श्री विठ्ठलाचे आशीर्वाद या कार्याला आहेत असे मी मानतो.

## हिंसाचाराचा पोलिसांच्या एसआयटीकडून तपास

# संभल येथे सापडली पाकी काडतुसे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**संभल :** उत्तर प्रदेशातील संभल येथे मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान झालेल्या हिंसाचाराचा तपास करत असताना पोलिसांना पाकिस्तान आणि अमेरिकेत बनवलेली काडतुसे सापडली. एका नाल्याजवळ ही काडतुसे जमिनीत पुरून ठेवण्यात आली होती. याप्रकरणाच्या तपासासाठी मंगळवारी ३ डिसेंबर २०२४ रोजी संभल येथे पोहोचलेल्या पोलीस एसआयटीला एकूण ६ काडतुसे सापडली आहेत.

हे संबंधित काडतुसे हे ९ एमएमचे होते अशी माहिती तपासातून समोर आली आहे.. एका काडतुसावर मेड इन यूएसए असे लिहिण्यात आले होते. हे काडतुसे ३२ कॅलिबरचे होतचे असे तपासात सांगण्यात आले. दुसऱ्या काडतुसावर एफएन स्टार असा टॅग लावण्यात आला होता. फॉरेन्सिक पथकाला हे सर्व काडतुसे नाल्याजवळ मातीत गाडलेली आढळली आहेत. याप्रकरणात कृष्णा कुमार बिश्नोई यांनी ही गंभीर बाब असल्याचे म्हटले आहे.

हे प्रकरण २४ नोव्हेंबर २०२४ रोजी घडले होते. मात्र त्यादिवशी मोठ्या प्रामाणात हिंसाचार झाला होता. त्या भागातील अनेक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचीही तोडफोड करण्यात आली होती. जे सीसीटीव्ही कॅमेरे होते अशा परिस्थितीत त्यांची तपासणी करत पुरावे गोळा केले जातील, असे त्यांनी सांगितले आहे.

१९ नोव्हेंबर २०२४ रोजी संभल येथील जिल्हा न्यायलयाने जामा मशिदीच्या सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आले होते. जामा मशिदीठिकाणी पूर्वी शंकर महादेवाचे मंदिर होते. जे मुघलांनी आक्रमण करत उद्ध्वस्त केले होते. हे सर्वेक्षण १९ नोव्हेंबर रोजी पूर्ण होऊ शकलो नसल्याचे म्हणणे आहे.

याप्रकरणात पुन्हा २४ नोव्हेंबर रोजी पोलीस प्रशासनाने जामा मशिदीठिकाणी धाव घेतली होती. जामा मशिदीच्या आसपासच्या भागात जमलेल्या मुस्लिम जमावाने हिंसाचार सुरू केला. यामध्ये अनेक पोलीस जखमी झाले असून एक पोलीस अधिकारी अनुज चौधरी यांनाही गोळी लागल्याची घटना घडली होती.



"लोकेश राहुल डावाची सुरुवात करेल. तो सलामीला येईल. पहिल्या कसोटी विजयात त्याने ज्या प्रकारे फलंदाजी केली आणि यशस्वी जैस्वालसोबत केलेली भागीदारी महत्त्वपूर्ण ठरली. भारताबाहेर त्याने चांगली फलंदाजी केली आहे, तो त्याला पात्र आहे.
— रोहित शर्मा

# यूपी योद्धाजचा विजय



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पूर्वार्धात सात गुणांनी पिछाडीवर असलेल्या यूपी योद्धाज संघाने बुधवारी प्रो कबड्डी स्पर्धेतील लढतीत तेलुगू टायटन्स संघावर ३६-३३ असा तीन गुणांनी निसटता विजय साकारला. यूपी योद्धाज संघ मध्यंतराला १७-१० असा पिछाडीवर होता. त्यानंतर यूपी योद्धाज संघाने उत्तरार्धात झोकात पुनरागमन करीत विजयाला गवसणी घातली.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या प्रो कबड्डी स्पर्धेत कर्णधार विजय मलिक याच्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर तेलुगू टायटन्स संघाने सुरुवातीपासूनच यूपी योद्धाज संघाविरुद्ध आघाडी घेतली. या लढतीच्या आठव्या मिनिटालाच त्यांनी पहिला लोण नोंदविला. त्यामुळे त्यांना १०-४ अशी आघाडी घेता आली.

यूपी संघाच्या बचाव तंत्रामधील चुकांचा फायदा तेलुगू संघाला मिळाला. तसेच त्यांचा हुकमी चढाईपटू भवानी रजपूत यालाही अपेक्षेइतके गुण मिळवता आले नाहीत. अर्थात यूपी संघानेही जोरदार लढत दिली. पूर्वार्ध संपण्यास पाच मिनिटे बाकी असताना त्यांनी तेलुगू संघाची आघाडी १३ विरुद्ध ९ अशी कमी करीत आणली होती. मात्र तेलुगू संघाच्या खेळाडूंनी पकडी व चढाई यामधील आपले कौशल्य सातत्याने दाखवत पूर्वार्धात १७-१० अशी आघाडी घेतली.

उत्तरार्धात सुरुवातीलाच यूपी योद्धाज संघातील खेळाडूंनी तेलुगू टायटन्स संघातील आशीष नरवाल व अजित पवार या दोन्ही भरवशाच्या चढाईपटूंच्या पकडी करीत सामन्यातील उत्कंठा वाढवली. त्यातच मलिक याचीही पकड झाल्यामुळे तेलुगू संघावर दडपण आले. त्यावेळी तेलुगू संघाकडे जेमतेम दोन गुणांची आघाडी होती. पाठोपाठ यूपी संघाने तेलुगू संघावर पहिला लोण चढविला आणि सामन्यास कलाटणी दिली. त्यांनी २० विरुद्ध १७ अशी आघाडीही मिळवली.

उत्तरार्धात पहिल्या आठ मिनिटात तेलुगू संघाला एकही गुण नोंदविता आला नव्हता यावरून यूपी संघाने कसा सामना फिरविला याची कल्पना येऊ शकते. त्याचे श्रेय मुख्यत्वे गगन गौडा याने केलेल्या यशस्वी चढायांना द्यावे लागेल. अखेर उत्तरार्धाच्या नवव्या मिनिटाला तेलुगू संघाने पहिला गुण मिळविला. सामन्याची शेवटची दहा मिनिटे बाकी असताना यूपी संघाकडे २२-१८ अशी आघाडी होती.

# अभिषेक शर्माचे वेगवान शतक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पंजाबचा सलामीवीर अभिषेक शर्मा याने ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये मेघालय संघाविरुद्ध २८ चेंडूंत शतक झळकावले. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या या लढतीतील अभिषेकच्या खेळीने ट्वेंटी-२०त वेगवान शतक झळकावणाऱ्या भारतीय फलंदाजाच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे.

अभिषेकचे हे SMAT मधील चौथे शतक ठरले आणि ही या स्पर्धेतील सर्वोच्च शतकांची संख्या आहे. मेघालयाने विजयासाठी ठेवलेल्या १४३ धावांचा पाठलाग करताना अभिषेकने २८ चेंडूंत शतक झळकावले. त्याने गुजरातचा सलामीवीर उर्विल पटेल ( २८ चेंडू वि. त्रिपुरा) याच्या विक्रमाशी बरोबरी केली. ट्वेंटी-२०त भारतासाठी वेगवान शतक झळकावणाऱ्या फलंदाजांमध्ये उर्विल व अभिषेक हे संयुक्तपणे अव्वल स्थानी आहेत. जगात हा विक्रम इस्टोनियाच्या साहील चौहानच्या ( २७ चेंडू वि. सायप्रस) नावावर आहे.

अभिषेकने ११ षटकार व ८ चौकार खेचताना २९ चेंडूंत १०६ धावांची नाबाद खेळी केली आणि संघाला ९.३ षटकांत विजय मिळवून दिला. त्याने सूर्यकुमार यादवचाही ट्वेंटी-२०तील विक्रम मोडला. कॅलेंडर वर्षात ट्वेंटी-२० सर्वाधिक षटकार खेचणाऱ्या भारतीय फलंदाजांमध्ये अभिषेक अव्वल स्थानी पोहोचला आहे.



# गोव्याच्या नितीश बेलूरकर याला विजेतेपद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बुद्धिबळ क्रीडा ट्रस्ट यांच्या तर्फे आयोजित २०व्या श्री महेश्वरानंद सरस्वती मेमोरियल अखिल भारतीय खुल्या फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत गोव्याच्या नितीश बेलूरकर याने ८.५ गुणांसह अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

गणेश सभागृह आणि अश्वमेध हॉल, कर्वे रोड, पुणे येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत आठव्या फेरीत गोव्याच्या नितीश बेलूरकरने वीरेश शरणार्थीचा पराभव करून ८.५ गुणांसह अव्वल क्रमांक पटकावला. सामन्यात नितीशने किंग्स इंडियन पद्धतीने डावास सुरुवात करत वीरेश शरणार्थीवर ६० चालींमध्ये मात केली. दुसऱ्या पटावरील लढतीत आकाश दळवीने हिमाल गुसैनचा ८ गुणांसह दुसरा क्रमांक पटकावला. सुयोग वाघने रामनाथन बालसुब्रमण्यमचा पराभव करून तिसरा क्रमांक पटकावला.

स्पर्धेतील विजेत्या नितीश बेलूरकर याला करंडक व ७५००० रुपये, तर उपविजेत्या आकाश दळवीला करंडक व ५०००० आणि तिसऱ्या क्रमांकाच्या सुयोग वाघला करंडक व २५००० अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आंतरराष्ट्रीय मास्टर चंद्रशेखर गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमसीएचे खजिनदार विलास म्हात्रे, बुद्धिबळ क्रीडा ट्रस्टचे ट्रस्टी प्रकाश कुंटे, चीफ आरबीटर आयए दिप्ती शिदोरे, डेप्युटी चीफ आरबीटर आयए अथर्व गोडबोले, आयए राजेंद्र शिदोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ऋतुराजची फटकेबाजी; उभारली मोठी धावसंख्या

**नवी दिल्ली :** सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत महाराष्ट्राचा कर्णधार ऋतुराज गायकवाडने सेनादलविरूद्धच्या सामन्यात धमाकेदार खेळी केली. त्याने सामन्यात ६ चौकार आणि ८ षटकारांच्या मदतीने ४८ चेंडूत ९७ धावा केल्या. ऋतुराजच्या जलद खेळीच्या मदतीने महाराष्ट्राने २० षटकांत ४ विकेट्स गमावत २३१ धावा उभारल्या. सेनादलाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या महाराष्ट्राच्या सलामीवीरांनी दमदार सुरूवात केली. ऋतुराज गायकवाड तुफान फटकेबाजी करत होता, तर अर्शिन कुलकर्णी मैदानावर स्थिरावण्याच्या प्रयत्नात होता. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ६२ चेंडूत १०७ धावांची शतकी भागीदारी केली. महाराष्ट्राच्या त्यानंतरच्या ३ विकेट्स मागोमाग गेल्या. राहूल त्रिपाठी १३ धावा करून बाद झाला, तर ऋतुराज गायकवाडचे शतक ३ धावांनी हुकले. अथर्व काळेने ७ चेंडूत १२ धावांचे योगदान दिले.

# गुलाबी चेंडूवर खेळणे आव्हानात्मक : केएल राहुल

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियात होणाऱ्या प्रकाशझोतातील कसोटी सामन्यात वापरण्यात येणारा कुकाबुरा बनावटीचा गुलाबी चेंडू गोलंदाजाच्या हातून सोडला जात असताना आणि क्षेत्ररक्षण करतानाही ओळखणे आव्हानात्मक असते, असे मत भारताचा भरवशाचा फलंदाज के.एल. राहुल याने व्यक्त केले.

असे असले तरी आम्ही येत्या शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या या कसोटी सामन्यास सज्ज आहोत, असाही विश्वास त्याने व्यक्त केला.

पर्थ येथे झालेल्या पहिल्या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाला २९५ धावांच्या विजयाचे पाणी पाजले.







